# साकळ

अनिरुध्द बनहट्टी

# साकळ

अनिरुद्ध बनहट्टी

ई साहित्य प्रतिष्ठान

साकळ

लेखक : प्रा. डॉ. अनिरुद्ध बनहट्टी
anibanister@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

मुखपृष्ठ : कनक वाईकर
kanak.waikar@gmail.com
Ph : 8888899126

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान
www. esahity. com
esahity@gmail. com

©esahity Pratishthan®2015

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

प्रकाशन : १८ मार्च २०१५

अर्पणपत्रिका

चोखंदळ वाचकांना
हा कथासंग्रह अर्पण करीत आहे.

अनिरुद्ध बनहट्टी

# कथानुक्रम


- चक्रव्यूह
- कुब्जा
- महाजाल इंद्रजाल
- निर्वासित
- परीसस्पर्श
- रेडिओ केऑस

“Your duty is to be and not to be this or that. 'I am that I am' sums up the whole truth. The method is summed up in the words 'Be still'. What does stillness mean? It means destroy yourself. Because any form or shape is the cause for trouble. Give up the notion that 'I am so and so'. All that is required to realize the Self is to be still. What can be easier than that?”

— Ramana Maharshi

# चक्रव्यूह

सकाळी बिपाशा वरच्या मजल्यावरुन खाली आली आणि जिन्यापाशी लपलेल्या अनघानं तिला ‘भोऽऽ!’ करून दचकवलं आणि ‘आऽऽ!’ करून घाबरलेल्या बिपाशाकडे पाहून अनघा खळखळून हसत राहिली. तिच्याकडे पाहून बिपाशाला वाटलं, काय सुंदर आहे ही! अगदी लाखात एक!

‘‘कसली दचकली! हाऽहाऽहाऽऽ!’’

‘‘काय हे वन्सं, असली थट्टा!’’

‘‘वन्सं? कोण वन्सं? अगं मला नुसतं अनघा म्हण, अन् मी तर तुला कालपासूनच ‘बिपू डार्लिंग’ म्हणायला लागले. वन्सं अन् वन्स मोअर काही चालणार नाही बरं का!’’

‘‘बरं-बरं ठीक, अनघा मला स्वयंपाक घरातलं दाखव सगळं, चहा-बिहा करायचं!’’

‘‘ओऽ हो! दादाला आज वहिनीसाहेबांच्या हातचा चहा मिळणार वाटतं!’’

‘‘चल! चल ना गं, सांग ना गं!’’

‘‘अहो, वहिनीसाहेब त्याची काहीच गरज नाही, तुमच्या वन्संसाहेबांनी चहा-नाश्ता सगळं करून ठेवलंय! चला, या टेबलावर!’’

बिपाशा मग अनघा बरोबर टेबलापाशी गेली. समोर टोस्ट, जाम, बटर, चकत्या कापून ठेवलेली उकडलेली अंडी, एक मोठी किटली ती टिकोझीनं झाकलेली आणि रिकाम्या कपबशा व्यवस्थित मांडलेल्या!

एवढ्यात अनीश दडदड जिना उतरून खाली आला आणि अनघाला टपली मारून बिपाशाच्या समोर बसला.

‘‘काय दादा, कशी काय गेली रात्र?’’

अनीश ब्रेडवर बटर फासत म्हणाला ‘‘मस्त! अंथरुणावर पडल्या-पडल्या गाढ झोपलोच मी!’’ अनीशनं उकडलेल्या अंड्यांच्या चकत्या बटर लावलेल्या ब्रेडवर ठेवल्या, काळी मिरी व मीठ शिंपडलं त्यावर दुसरी ब्रेडची स्लाइस ठेवली आणि एक मोठा लचका तोडत म्हणाला, ‘‘खूप थकलो होतो नं!’’

‘‘काय गं बिपू डार्लिंग, खरं सांगतोय का दादा?’’ अनघा म्हणाली.

‘‘अं.....होऽ!’’ बिपाशा हसून म्हणाली.

‘‘बापरे! कसले अनरोमँटिक कपल्स आहात तुम्ही!’’

अनीश म्हणाला ''अनघा, तुझं लग्न होईल ना, तेव्हा तू कर रोमँटिकपणा अन् नंतर दुसऱ्या दिवशी ऑडियन्स जमवून सांग सगळ्यांना वर्णन करून डीटेलमध्ये.''

''अरेऽऽ!'' अनघानं लाजून चेहरा झाकून घेतला.

''आमचा दादा नं, अगदी मूर्ख, बुद्धू बावळट आहे! सायंटिस्ट विक्षिप्त असतातच म्हणा! पण बिपू, तो खूप चांगला पण आहे हं! जरा डलार्ड, नीरस, रुक्ष असला तरी!''

बिपाशानं अनघाच्या रेशमी, लांबसडक केसांवरून हात फिरवला आणि ती म्हणाली, ''काही काळजी करु नकोस अनघा, अनीश आणि मी काल खूप चांगले मित्र झालो. तू आमची चिंता करु नकोस, आम्ही खूश आहोत अगदी!''

''सॉरी दादा! सॉरी बिपू डार्लिंग!'' अनघा म्हणाली आणि आपली उरलेली कॉफी एका घोटात संपवून बाहेर बागेत पळाली.

***

अनीश ऑफिसला गेल्यावर बिपाशानं आईचं सगळं आवरलं. त्यांच्यासाठी चोवीस तासांची नर्स सुमन होती. सुमननं आईंना अंघोळ घालून, फिजिओथेरपी दिली आणि बाहेर उन्हात हळूहळू फिरवून आणलं. अनघानं बिपाशाला स्वयंपाकाला हात लावून दिला नाही आणि स्वतः सगळा स्वयंपाक करून, डबा घेवून ती कॉलेजला पळाली.

आणि मग दुपारी जेवण करून, आई दुपारच्या झोपल्या असतांना, बिपाशाला एका उदासवाण्या कंटाळ्यानं घेरलं! तिला अचानक समीरची आठवणं आली. मस्तकात संतापाची एक तिडीक उठली पण त्याबरोबरच त्या गत दिवसांच्या आठवणींनी छातीत धडधड देखील व्हायला लागली. खरंच अनीश जरा रुक्षच होता तसं पाहिलं तरं! टीव्ही समोर बसल्या-बसल्या बिपाशाला डुलकी लागली आणि तिच्या स्वप्नात समीर बरोबरच्या जुन्या आठवणींचा चित्रपट सुरू झाला.

***

समीरची आणि तिची पहिली भेट झाली होती कॉलेजच्या नाटकात. कॉलेजातला अत्यंत पॉप्युलर मुलगा शिवाय तिचा सिनियर! तो कॉलेजचा ड्रामा सेक्रेटरी. नाट्यमंडळाचा अध्यक्ष होता आणि त्यानं नाटकात नायिकेचा रोल बिपाशाला दिला होता. अगदी पहिल्या रिहर्सल पासूनच बिपाशा, समीरच्या प्रेमात पडली होती. बिपाशाचं नुकतंच एकविसावं वर्ष संपलं होतं आणि त्या वेड्या वयात ती वाहवत गेली होती. रंगमंचावरचं नायक-नायिकेचं प्रेम रंगमंचाबाहेर देखील रंग घ्यायला लागलं आणि त्यामुळे त्या नाटकाच्या प्रयोगांमध्ये एक अद्‌भुत आकर्षण निर्माण झालं. आंतर महाविद्यालयीन, राज्य पातळी सगळ्या स्पर्धा भराभर जिंकत ते नाटक खूप गाजलं. त्या नाटकाबरोबर बिपाशा-समीरची जोडी सुद्धा !

बिपाशाच्या घरचे संस्कार चांगले असल्याने बिपाशाने एका ठराविक मर्यादेबाहेर आपल शरीरिक प्रेम जाऊ दिल नाही. त्यामुळे समीर वैतागत राहिला. आतापर्यंत त्याला बिपाशासारखी मुलगी भेटली नव्हती. त्याचं देखणं व्यक्तिमत्व, उमदा स्वभाव, प्रचंड श्रीमंती, कलागुण यांनी आकर्षित झालेल्या सर्व मुलींनी आतापर्यंत त्याला सर्व काही दिलं होतं पण बिपाशाच्या बाबतीत त्याला वेगळाच अनुभव येत होता. अगदी सरळ-सरळ ती त्याच्या प्रेमात गुंतलेली होती पण तरीही अलिप्त ! ती त्याच्या बरोबर रहायची पण मामुली स्पर्श यापुढे जायला नकार द्यायची ''लग्नानंतर !'' ती म्हणायची अगदी चुंबनासाठी सुद्धा! समीरने खूप प्रयत्न केले, रागावणे, चिडणे, रडणे, दोन-दोन दिवस न भेटणे पण शेवटी त्याला शरण यावं लागायचं. बिपाशा आपली अलिप्त रहायची. म्हणून मग एक दिवस त्यानं एक योजना आखली. आपल्या फार्महाऊसवर दोन मित्र आणि एक मैत्रिणीबरोबर ट्रिप अरेंज केली आणि बिपाशाला त्यानं कोल्ड्रींक्समधून काही मादक द्रव्य पाजलं, त्याचे बाकीचे मित्र त्या दोघांना फार्महाऊसवर सोडून निघून गेले, समीरला वाटलं झालं! आपण बाजी जिंकली. आता ही कायमची आपल्या ताब्यात आली. त्याने तिचे फोटो काढून तिला ब्लॅकमेल करायचं ठरवलं होत पण दोन फोटो काढून होतात न होतात तोच त्याचा फार्महाऊसवरचा विश्वासू नोकर रामदीन दारावर ठकठक करायला लागला. समीरने ''काय झालं?'' विचारलं तर रामदीन म्हणाला, ''आता फोन आला होता, मोठेसाहेब अर्ध्या तासात येत आहेत फार्महाऊस वर!''

समीरचे वडील फार्महाऊसवर येत होते, समीरचे वडील फार कडक होते, त्यामुळे समीर घाबरला. काय करावं ते त्याला सुचेना. कारण बिपाशा अजून गुंगीच्या अमलाखाली होती आणि आणखी काही तास म्हणजे सकाळी पाचपर्यंत तरी शुद्धीवर येणार नव्हती. मग रामदीनने समीरला धीर दिला. बिपाशाला त्या खोलीत बंद ठेवून बाहेरुन हँडल लॉक केलं आणि रामदीननं समीरला पुण्याला घरी परत जायला सांगितलं. समीरनं त्याचा सल्ला मानला आणि बिपाशाला फार्महाऊसवर तसंच टाकून तो घरी परतला.

पहाटे-पहाटे बिपाशाला जाग आली. ती दचकून उठून बसली. पहिल्यांदा कळेना मग तिला सगळं आठवलं. शुद्ध जाता-जाता तिला समीरचा डाव कळला होता, बेशुद्ध होता-होता ती अतिशय घाबरलेली होती, आता ती दचकून उठून बसली आणि तिनं पाहिलं तर तिच्या अंगावर सिल्कचा गाऊन होता आणि तिचे कपडे बेडच्या बाजूच्या पडलेले होते, तिच्या मनात एक आग पेटली, संतापून ती ताडकन उठली आणि भराभर कपडे घालून दारापाशी गेली. दार बाहेरून बंद आहे हे पाहून ती आणखीच संतापली तशीच घाबरली देखील. ती खोलीत इकडे-तिकडे पाहत असता तिला टेबलावर एक चिठ्ठी मिळाली तिने चिठ्ठी उघडून पाहिली ती समीरने चिठ्ठी लिहिलेली होती.

प्रिय बिपाशा,

काल पार्टीला तुझी तब्येत अचानक खराब झाली. आम्ही तुला या बेडरुममध्ये रामदीनच्या बायकोच्या मदतीने झोपवलं. एवढ्यात रात्री वडील आले त्यामुळे तुझी खोली लॉक करून टाकली. तू पलंगाजळवचं बेलचं बटण दाब. रामदीन तुला पुण्याला पोहोचवायची व्यवस्था करेल.

तुझा समीर

बिपाशा हसली. कसला हरामखोर निघाला हा समीर! तिला ती बेशुद्ध होतानाचा प्रसंग पूर्ण आठवत होता. तिची खात्री होती की तिचा तब्येत वगैरे काहीही खराब झाली नव्हती. अगदी नक्की तिला पेयातून काहीतरी पाजलेलं होतं. मग तिने त्या खोलीत कपाटं उघडून इकडे-तिकडे थोडं संशोधन केलं. तर आदल्या रात्री समीरने घाई-घाईमध्ये कपड्यांच्या गठ्याखाली लपवलेला डिजिटल कॅमेरा तिला दिसला. तिने त्यातले फोटो पाहिले तर तिचेच अर्धनग्न अवस्थेतले दोन फोटो होते ते तिने ताबडतोब डिलीट करून टाकले. तिला एका ड्रॉवरमध्ये आणखी काही फोटो सापडले बहुतेक फोटो मुलींचेच होते, आपल्या श्रीमंतीचा, आपल्या कलागुणांचा, आपल्या देखणेपणाचा असा उपयोग करत होता तर समीर ! पण ते फोटो पाहतांना तिला काही पत्र सापडली आणि ती चकित झाली. एका स्त्रीने त्याला धमकी देणारी पत्रं लिहिलेली होती, तारीख साधारण वर्षभरापूर्वीची होती, त्या पत्रांबरोबर होते काही फोटो, ती स्त्री व समीर यांच्या लग्नसमारंभाचे फोटो एका देवळातले, त्या समारंभाला समीरचे १-२ मित्रच काय ते हजर होते आणि नंतर त्याच मुलीबरोबर समीरचे भलत्या-सलत्या अवस्थेत फोटो, त्या स्त्रीचं नाव होत रुपाली ! बिपाशाला किळस आली. तिने ते फोटो आणि ती पत्र आपल्या पर्समध्ये टाकली आणि मग रामदीनसाठी बेल वाजवली.

***

बिपाशा दचकून उठली टी.व्ही. तसाच सुरू होता. तिने टी.व्ही बंद केला आणि ती बेडरुममध्ये जावून झोपली. अर्धा तास झोप होत नाही तोच बेल वाजली. दुपारचे साडेतीन वाजून गेले होते, बिपाशाने दार उघडलं तर अनीश.

''तुम्ही, साडेपाच वाजता येणार होता ना!''

''हो, पण मी अर्धा दिवस सुट्टी घेतली.''

आपल्या बेडरुममध्ये जाताच अनीशने बिपाशाला आपल्या मिठीत बंदिस्त करुन तिच्या ओठांवर ओठ ठेवले. बऱ्याच वेळानंतर ते वेगळे झाले तेव्हा अनीश म्हणाला, ''सरप्राईज ! सरप्राईज!!''

''काय?''

''हे बघं!'' अनीशने तिच्या समोर दोन चेकबुक सारखी पण पातळ फोल्डर्स नावली. ती हातात घेऊन बिपाशा आश्चर्याने डोळे मोठे करून म्हणाली, ''विमानाची तिकिटं? कुठली?'' मग ती तिकीट उघडून पाहत म्हणाली. ''बापरे! स्विझलैंड! न्यूयॉर्क!''

''यस! माय डार्लिंग वाईफ! आपल्या हनीमुनसाठी मी आजपासून पंधरा दिवसांची रजा काढली आहे. मी या तिकिटांचीच वाट पाहत होतो, उद्या पहाटेच आपल्याला निघायचंय!''

''बापरे! मग पॅकिंगची घाई करावी लागणार!''

''तसं काही नाही. मी आधीच सगळी लिस्ट करून सगळं या कपाटाच्या वरच्या खणत ठेवलं आहे ते फक्त तू सुटकेसेस मध्ये भरायचं.''

''पण गरम कपडे वगैरे आणवे लागतील ना विकत? निदान माझेतरी!''

''काही गरज नाही. मी सगळं आणून ठेवलंय आपलं दोघांचंही! अगदी ट्रॅव्हल एजंटने दिलेल्या लिस्टप्रमाणे. अगदी ए टू झेड्!'' बिपाशा त्याच्या गळ्यात हात घालून म्हणाली, ''ओह! ग्रेटच आहात की तुम्ही!''

***

स्विझलैंड! धरतीवरचा स्वर्ग! बिपाशा आणि अनीश यांचे पंधरा दिवस उघड्या ठेवलेल्या अत्तरासारखे उडून गेले. बर्फाच्छादित माऊंट टिटलीसच्या गोल केबलकारमधून असह्य उंचीवर तरंगत जातांना बिपाशाचं मन भरून आलं. ती अनिशकडे पाहत होती. तो हात लांब करून तिला पांढऱ्याशुभ्र बर्फातल्या लालबुंद छपरांचं बनलेलं, आल्प्स् पर्वतातलं एक स्विस खेडं दाखवत होता.

किती सरळ आहे हा! नाहीतर समीर कसला गुंतागुंतीचा होता, बिपाशाने नंतर समीरशी संबंधच तोडून टाकले होते आणि त्यानं तिला धमक्या देण्याचा प्रयत्न केला होता तेव्हा तिनं त्याला फक्त एकदा सांगितलं होत की, ''रुपालीची सगळी पत्रं व तुमचे दोघांचे सगळे फोटो माझ्याकडे आहेत. तुमच्या लग्नाचे सुद्धा!'' तेव्हा त्याने घाबरून काढता पाय घेतला होता. इतकचं काय, त्याने कॉलेज बदललं होत आणि वर्षभरात तो दोन वर्षासाठी अमेरिकेत शिकायला गेला होता. इकडे बिपाशाचं कॉलेज पूर्ण झालं, तिनं ७-८ महिने बऱ्यापैकी नोकरी देखील केली होती आणि मग एका मध्यस्थाकडून हे अनीशचं स्थळ आल होतं. आता ती अनीश सोबत उंच आकाशात तरंगत होती आणि खाली पाहत होती. तिने अनीशचा दंड धरला आणि ती त्याला घट्ट बिलगली.

***

'बिपाशा साठे' ही 'बिपाशा भंडारी' झाल्यानंतर भंडारींच्या घरात चांगली रुळली. अतिशय तृप्त अशा आयुष्याची गोडी चाखायला लागली, घरात फक्त अनीश, अनघा आणि आई. आई आजारी असल्यामुळे त्यांची चोवीस तासांची नर्स सुमन घरातच रहायची त्यामुळे काम असं

काही विशेष नसायचंच पण बिपाशा त्या घरात आल्यापासून घर एकदम लख्ख झालं होतं, बिपाशानं घराची सजावट बदलून टाकली. अनीशच्या ऑफिसमधल्या लोकांच्या काही पार्ट्या झाल्या तेव्हा त्याच्या सहकाऱ्यांनी बिपाशाच्या स्वयंपाकाची, घराच्या सजावटीची खुप स्तुती केली. तशी बिपाशा अगदी सुखानं तृप्त होत होती पण आता आईंना घाई झाली होती नातवाचं तोंड पाहण्याची!

अनघा बिपाशाची आधीपासूनच मस्त गट्टी जमलेली. आपल्या कॉलेजच्या सगळ्या गमती अनघा बिपाशाला सांगत बसायची. एक दिवस गप्पा मारत बसल्या असतांना अनघानं विचारल, ''बिपू, तू इतकी सुंदर आहेस तर कॉलेजात खूप मुलं तुझ्यामागे असतील नाही?''

बिपाशाला अचानक समीर आठवला. तिला कॉलेजमधले ते धुंद दिवस आठवले, समीरचं खरं रुप समोर येण्याच्या आधीचे दिवस! तिनं कसाबसा त्या जुन्या आठवणींचा उफाळून येणारा पूर थोपवला.

''हो! होते ना! खूप जण होते!'' ती वरवर म्हणाली.

''मग, तू कुणा बरोबर प्रेम वगैरे केलं होतसं का? तुझं लव्हमॅरेज कसं काय नाही झालं?''

''छे! माझं काही कॉलेजात कुणाशी जमलं-बिमलं नाही हं! मी आपली कॉलेज संपल्यावर आईबाबांनी सांगितलं तिथं लग्न करून मोकळी झाले.''

''अंऽऽ! हे काय गं? मला वाटलं तू मस्त चवदार दोन-चार प्रकरण तरी सांगशील आणि दादाशी तुझं लग्न झाल्यावर त्याचा प्रेमभंग कसा झाला त्या कहाण्या पण सांगशील!''

''अनघा, आयुष्य म्हणजे काही कहाणी किंवा कादंबरी नसते.''

''हो! आयुष्य म्हणजे खूप गंभीर चष्मा लावलेली आजीबाई असते नाही का?''

''कधी...कधी... आयुष्य कादंबरीपेक्षा जास्त गुंतागुंतीचं व अतर्क्य असतं!'' आणि ती विचारात गढून गेली. तिला हलवून भानावर आणत अनघा म्हणाली, ''बिपू, कसल्या विचारात गढून गेली होतीस?''

''जाऊ दे! वाईट आठवणी पुसून टाकलेल्याचं बऱ्या!'' बिपाशा म्हणाली.

''सॉरी! पुन्हा हा विषय काढणार नाही.'' अनघा म्हणाली.

''वेडाबाई! अगदी वेडाबाई आहेस तू म्हणजे!'' बिपाशा हसून म्हणाली.

***

काही दिवसांनी बिपाशाला जाणवलं की अनघात काहीतरी बदल झालाय ती पूर्वीसारखी मोकळेपणानं गप्पा मारत नाही. तेव्हा मग बिपाशानं एकदा तिला मुद्दाम थांबवून घेतलं आणि विचारलं, ''काय अनघा, सध्या काय माझ्यावर रुसलीस की काय?'' अनघानं बिपाशाच्या

डोळ्यात रोखून पाहिलं. सांगू का नको असे भाव तिच्या डोळ्यात उमटले आणि मग एकदम हसून तिने बिपाशाला मिठी मारली. ''बिपू! बिपू!'' ती बिपाशाला घेऊन गिरक्या घेत म्हणाली, ''आय ॲम इन लव्ह! बिपू! मी प्रेमात पडले, मला माझा राजकुमार मिळालाय.''

''अरे ! हो, हो'' तिला खाली बसवत बिपाशा म्हणाली, ''चल बैस इथे आणि मला सांग सगळं.''

''सांगते ना! आमच्या कॉलेजात एक फंक्शन होत आणि तो चीफ गेस्ट बरोबर आलेला होता. मला माहितच नव्हतं. नुकताच अमेरिकेहून परत आलाय तो, मला त्यानं पाहिलं आणि तो माझ्यावर एकदम फिदा झाला मग दुसऱ्या दिवशी तो कॉलेजच्या गेटपाशी थांबला, त्यानं मला अडवलं, मला तो कॉफीसाठी घेऊन गेला आणि पहिल्याच भेटीत कॉफी पिता-पिता त्याने मला प्रपोज केलं. तो दोन महिन्यात पुन्हा अमेरिकेला जाणार आहे. घरचा खूप श्रीमंत आहे आणि अमेरिकेतही त्याला चांगली नोकरी आहे.''

''ओऽहो! आणि दिसायला?''

''बिपू ! इतका चिकणा, हँडसम, मॅनली आहे ना तो! मैं तो पूरी मर मिटी हूँ उसपे!''

''आणि त्याला काही नाव आहे का नाही?''

''आहे ना! समीर नाव आहे त्याचं!''

बिपाशा चमकली. समीर? हा तिचा समीर तर नाही? समीर दास्ताने तर नाही?

''आणि आडनाव?''

''बिपू! तू पण ना! असं आडनांव विचारतं का कुणी? रोमँटिक गप्पा मारताना? इमॅजिन! तो मला म्हणतोय- त्या दिवशी स्टेजवर बसलो असतांना तुला पहिल्या रांगेत बघितलं, चीफगेस्टची ओळख करून देणारं भाषण देताना तुला जवळून पाहिलं, मग पूर्ण कार्यक्रमभर फक्त तुलाच पाहत होतो, कुणाच्याही भाषणांतलं एक अक्षर मला ऐकू येत नव्हतं आणि मी विचारतेय - ते सगळं ठीक आहे पण तुझं आडनाव काय?''

बिपाशा हसली ''खरंच इतका रोमँटिक बोलतो तो?''

''होऽ!'' चेहरा स्वप्न पाहत असल्यासारखा करून अनघा म्हणाली. अनघा हळू-हळू जास्त-जास्त बाहेर रहायली लागली. रात्री उशीरा यायला लागली पण तरी इतकी खूष इसत होती की बिपाशाने काही तिला रोखलं नाही शिवाय तिनं एक दिवस बिपाशाला सांगितलं होतं की त्याचं पूर्ण नाव आहे, समीर करमरकर!

''तू विचारलंस आडनाव त्याला?''

''हो ना ! दुसऱ्याच भेटीत!''

''मग ? काय म्हणाला तो?''

''आधी मला आपल्या घरची माहिती विचारली त्यानं आणि मी जेव्हा आपली सगळी माहिती दिली तेव्हा त्यानं देखील त्याची सगळी माहिती दिली.''

''ओऽ हो!'' बिपाशा म्हणाली होती आणि अनघाच्या समीरचं नाव दास्ताने नसून करमरकर आहे हे कळल्यावर तिची चिंता मिटली होती. असे बरेच दिवस स्वप्नासारखे गेले मग एक दिवस अनघा रात्री साडेबारानंतर परत आली. अनीश कंपनीच्या कामासाठी गावाला गेला होता. अनघा आली ती खूपच अपसेट दिसत होती, बिपाशानं दार उघडताच ती धावत आपल्या खोलीत गेली व तिनं दार लावून घेतलं. बिपाशानं बरेच प्रयत्न केल्यावर अनघानं दार उघडलं. रडून-रडून तिचे डोळे लाल झाले होते. ''काय झालं? अनघा सांग मला!'' अनघा पलंगावर बसली ''समीरनं मला फसवलं.'' ती म्हणाली. ''तू किती जुनाट विचारांची आहेस असं चिडवत राहून त्याने मला नको ते करायला लावलं, गेला आठवडाभर आम्ही सतत बरोबर होतो, त्यानं जे काही मागितलं ते मी दिलं आणि दोन दिवसांपासून तो मला टाळायला लागला. शेवटी मी त्याला गाठलं तर तो माझ्याशी लग्नही करणार नाही आणि मला त्याच्याबरोबर अमेरिकेला नेणार नाही असं स्पष्ट सांगितलं'' अनघा थांबली. तिने बिपाशाकडे रोखून पाहिल ती म्हणाली, ''वहिनी, त्याचं आडनाव देखील त्यानं खोटं सांगितलं होतं. त्याच खरं नाव समीर दास्ताने!''

''बापरे!''

''हो! मला त्यानं माझ्या फॅमिलीची पूर्ण माहिती विचारली तेव्हाच त्याला कळलं.'' अनघा, बिपाशाकडे अविश्वासानं, शत्रुत्वाच्या भावनेनं पाहत होती. शेवटी ती रागानंच म्हणाली, ''मला त्यानं तुझ्याविषयी सगळं सांगितलं.''

''त्यानं माझ्याविषयी तुझ्याकडे बरंच गरळ ओकलेलं दिसतंय.''

''म्हणजे? त्यानं सांगितलेलं सगळं खोट होतं?''

''हो. त्यानं थापा मारल्या! जाऊ दे! तू त्याला आता विसरून जा! आणि एक लक्षात ठेव मी अनीशला सगळं आधीच सांगितलं होतं. लग्नाआधीच. तू त्याच्या बोलण्यानं माझ्याविषयी शंका घेऊ नकोस!'' अनघाच्या चेहऱ्यावर अचानक भीती दिसायला लागली ''बिपू, त्यानं मला धमकी दिली आहे गं! माझे नको तसे फोटो त्यानं गुपचूप काढलेत, त्याच्या एम.एम.एस. क्लिप्स बनवून तो मोबाईल फोन्सवर त्या सर्क्युलेट करणार आहे. मी त्यानं सांगितलं तिथं, सांगितल्या वेळी नाही गेलं तर!''

बिपाशाच्या मनात संतापाची शिणिक उठली. मग तिला आपण काही वर्षापूर्वी केलं ते योग्य होतं याची जाणीव झाली. तिनं समीरला तिच्या दोन खास मैत्रिणींच्या फोटोंच्या बदल्यात

रुपालीचे फोटो आणि पत्रं परत दिली होती. आता तो बिपाशाला निरुपद्रवी समजत होता, तो इतका स्वतःला हुशार समजत होता की, अनघा तिच्या नात्यात आहे हे कळून देखील तो घाबरला नव्हता. उलट स्वतःचं खोटं आडनाव सांगून त्याने आपला मतलब साधून घेतला होता. आता तो अनघाच्या मनातच बिपाशाविषयी विष कालवत होता, बिपाशा हसली. किती चांगलं केलं तिनं त्या रुपालीच्या पत्रांच्या झेरॉक्स आणि फोटोंच्या दहाबारा कॉपीज काढून ठेवण्यात! ती अनघाला म्हणाली, ''उद्या. बोलावलयं तुला त्यानं?''

''हो!''

''कधी?, कुठे?''

''सकाळी अकरा वाजता, त्याच्या एका मित्राच्या रिकाम्या फ्लॅटवर!''

''ठीक आहे. तू काळजी करू नकोस मी येते तुझ्याबरोबरं पण त्याआधी आपण माझ्या बँकेच्या लॉकरमध्ये जाऊ तिथं सेफ डिपॉजिट व्हॉल्ट मध्ये मी माझ्या भारी दागिन्यांबरोबर काही महत्वाच्या वस्तू देखील ठेवल्यात!''

***

समीरनं मॅजिक आयमधून पाहिलं, अनघा आली होती. तो खूष झाला. त्याने दार उघडलं आणि अचानक अनघा बरोबर बिपाशा देखील आत आली. समीर चक्रावला, बिपाशाने शांतपणे दार लावून घेतलं आणि वळून खाडकन् समीरच्या थोबाडीत ठेवून दिली. तो उसळून तिच्यावर हल्ला करणार तर तिने आपला गुडघा पूर्ण जोर लावून त्याच्या पोटाखाली बरोबर मर्मस्थळी मारला. तो कळवळून पुढे झुकून विव्हळायला लागला, बिपाशाने तिथलाच एक लोखंडी फ्लॉवरपॉट घेऊन त्याला बडवून काढायला सुरुवात केली. अनघा चकित होऊन पाहत होती मग तिला देखील राहवलं नाही आणि तिने देखील त्याच्या थोबाडीत लागोपाठ १०-१५ वेळा मारुन त्याचे गाल लाल करून सुजवले. एवढ्यात बेल वाजली आणि बिपाशानं दार उघडलं. तो फ्लॅट ज्या मित्राचा होता त्याची गचांडी धरून इन्स्पेक्टर धुमाळ आत आले. ''हा मोहन साने. या दोघांनी इथे अड्डाच बनवला आहे.'' इन्स्पेक्टर म्हणाले.

मोहन इतका घाबरला होता की त्याने आतल्या कपाटातून भराभर एक हँडीकॅम आणि दोन-चार मोबाईल्स् काढून दिले. त्यात तीन-चार मुलींचे फोटो होते. इन्स्पेक्टर धुमाळ म्हणाले, ''त्या मुलींना कशाला यात खेचायचं? डिलीट करून टाका सगळे!'' म्हणून त्यांनी सगळे फोटो नष्ट केले, हँडीकॅमच्या सीडीजचे तुकडे-तुकडे केले.

''हे पहा ! इन्स्पेक्टर साहेब, रुपाली बरोबरच्या त्याच्या लग्नाचे फोटो आणि ही पत्रे!''

''अरेऽ भडव्याऽ!'' समीरला एक दणकट लाथ घालत इन्स्पेक्टर म्हणाले, ''तू अमेरिकेतून आलास ना? बघू, पासपोर्ट तुझा?'' समीरने थरथर कापत आपला पासपोर्ट आणला.

''अच्छा! खोटी माहिती देऊन केलेला पासपोर्ट! विवाहीत असतांना अविवाहित म्हणून लिहिलंय! चल, तुझा पासपोर्ट जप्त करून तुला जेलमध्येच घालतो! काय रे, मोहन साने? तुलाही जायचंय का आत? का माफीचा साक्षीदार होतोस?''

''नाही साहेब. मी सगळं सांगेन कोर्टात मी माफीचा साक्षीदार होतो!''

***

काही महिने गेले, लोक समीर दास्तानेच्या वर्तमानपत्रातल्या प्रकरणाला विसरुन सुद्धा गेले. समीरला वेगवेगळ्या गुन्ह्यांसाठी पंधरा वर्ष शिक्षा झाली. खोट्या पासपोर्टवर आल्यामुळे अमेरिकन युनिव्हर्सिटीनं त्याची डिग्री कॅन्सल केली. एक दिवस संध्याकाळी अनघा परत आली तेव्हा बिपाशा व अनीश तिची वाटच पाहत होते.

बिपाशा म्हणाली, ''अनघा, ह्यांनी आणि मी तुझ्यासाठी एक मुलगा पाहिलाय. तू भेटशील उद्या त्याला?''

अनघा लाजली म्हणाली, ''वहिनी, दादा, मी तुमच्या मर्जीबाहेर नाही!''

अनीश म्हणाला, ''नाही, असं नाही चालणार. तुम्ही दोघांनी उद्या एकमेकांना पाहून पसंत तर करा मग पुढचं ठरवू!''

''ठीक आहे!''

***

बिपाशाचा निरोप घेऊन आपल्या सासरी जातांना अनघाला अश्रू आवरत नव्हते. ''वहिनी, तू नसतीस तर!'' ती हुंदके देत म्हणाली ''दादाला काही कळलं नाही ना?'' अनघानं विचारलं.

''नाही गं! तू आता शांत हो बरं! तुझं सासर तर पुण्यातच आहे, कधीही ये ना मला भेटायला!''

''ठीक आहे.''

''जाता-जाता एक चांगली बातमी ऐक!''

''चांगली बातमी!''

''हो! तू लवकरचं आत्या होणार आहेस.''

''खरंच बिपू ? खरंच!''

''हो गं, वेडाबाई, खरंच!''

अनघाच्या अश्रूंचं प्रसन्न हास्यात रुपांतर झालं आणि ती आपल्या देखण्या नवऱ्याबरोबर कारमध्ये बसून बिपाशाकडे पाहत हात हलवत राहिली. अगदी बिपाशा दिसेनाशी होईपर्यंत!....

***

# कुब्जा

मीनल स्वतःला कधीच कुरुप समजायची नाही; पण आता आरशासमोर उभी राहून ती स्वतःकडं बघत असताना 'कुरुप' या शब्दाचा जणू प्रथमच अर्थ समजत असल्यासारखा तिचा चेहरा काळवंडत गेला. तिला आपला चेहरा राक्षसी वाटायला लागला. स्वतःचे डोळे निस्तेच होऊन तिरळे झाल्यासारखे वाटले. ओठ विचकल्यासारखे होऊन त्यातून टोकेरी दातांची रांग दिसली. ओठांच्या दोन्ही बाजूंना ड्रॅकुलासारखे दोन सुळे बाहेर आले. आरशातली प्रतिमा सळसळ सळसळ हलायला लागली आणि आरशातल्या त्या चेटकिणीचं बाकदार, चोचीसारखं नाक बाहेर आलं. आरशाच्या पृष्ठभाग तडकल्यासारखा होऊन त्या चेटकिणीचं डोकं बाहेर येऊन मीनलच्या चेहऱ्याच्या जवळ येऊन कुजबुजायला लागलं,

'तू चेटकीण आहेस.

तू कुब्जा आहेस.

तू घाणेरडी आहेस.

तू काळी काळी आहेस.

तू कुरुप आहेस!'

आणि ती चेटकीण मीनलच्या गळ्यापाशी वाकली. आपले दोन लांब सुळे तिच्या गळ्यात रुतवण्यासाठी. मीनल ओरडली.

मीनलकडं आतापर्यंत लक्ष नसलेली तिची पार्टनर सोनाक्षी आश्चर्यानं मीनलकडं पहायला लागली.

रिमोट बाजूला टाकून सोफ्यावरून उठून मीनलजवळ येऊन आरशातल्या मीनलच्या डोळ्यांमध्ये पहात सोनाक्षी म्हणाली,

''काय झालं गं ? अशी का ओरडलीस?''

''काही नाही.'' मीनल विझलेल्या आवाजात म्हणाली. सोनाक्षीनं नजर हटवली आणि मघापासून मीनलला जे सांगायचं सांगायचं म्हणत होती, ते तिनं सांगितलं.

''मीनू, आज डिनरची ट्रीट देतेय मी तुला!''

चमकून मीनल वळली.

''या आठवड्यात तिसऱ्यांदा!''

''प्लीऽऽज, मीनूऽऽ!''

''ओके, ओके!'' मीनल म्हणाली आणि तिनं सोनाक्षीनं पुढं केलेले पैसे घेतले आणि ती बाथरुममध्ये जाऊन बाहेर जाण्याची तयारी करायला लागली. वासुदेव येणार होता नं संध्याकाळी, सोनाक्षीचा मंगेतर! तिचा 'वुड बी', तिचा बॉयफ्रेंड! अन् असं असलं की, मीनल दोन-तीन तास बाहेर जायची. कधी एखादा पिक्चर पाहायची, कधी नुसतीच भटकून कुठंतरी महागडं जेवण घेऊन परत यायची. तोपर्यंत वासू येऊन गेलेला असायचा. बहुतेक वेळा सोनाक्षीला डिनरला बाहेर घेऊन गेलेला असायचा. अन् मीनल आपल्या चावीनं लॅच उघडून आत यायची. सोनाक्षी मग खूप उशीरा परत यायची. वेगळीच दिसायची. तृप्त. झोपाळलेली. जास्त काही सांगायची नाही. शेवटी हे मुंबई होतं, प्रत्येकाला आपापली 'पर्सनल स्पेस' फार प्यारी होती.

***

'केवढी क्यूऽट मुलगी आहे!' मीनलला शेजारच्या नवीन रहायला आलेल्या जोडप्याची तीन वर्षाची मुलगी खूप आवडलेली. मीनल त्यावेळी नववीत होती. पण मीनलनं तिचा गालगुच्चा घेतल्यावर शमिकानं, हो, त्या तीन वर्षाच्या क्यूऽट मुलीचं क्यूऽट नाव शमिका होतं, तर शमिकानं मोठ्ठे डोळे करून बरेच क्षण टक लावून आपल्या चेहऱ्याजवळ आलेला मीनलला चेहरा पाहिला, अन् मग तोंड वेडवाकडं करत मोठ्ठा आवाज काढून रडायला सुरूवात केली. शेजारणीशी गप्पा मारणारी तिची आई धावत आली.

'काय झालं शम्मी? माझी लाडू गोडू, कुणी ललंवलं माझ्या गुडूला?'

'अं... मम्माऽऽ ! मला तिची भीती वाटते ! तिला जायला सांग!' मीनलकडं बोट दाखवून तिकडं न पाहता शमिका रडत राहिली.

'असं नाही बेटा. तिची कसली भीती वाटायची? छान छान ताईए तुझी! अं? चल, आपण घरी जाऊ ! अं? मग खाऊ देते तुला!'

नववीत असताना पहिल्यांदा आपण अगदी कुरुप आहोत हे मीननला समजलं. तिला लहानशा गोऱ्या गोऱ्या क्यूऽट शमिकाचा भयंकर राग आला. नंतर शमिका तिला घाबरेनाशी झाली. तिच्याशी खेळायलाही लागली. पण त्या दिवसापासून मीनलला सगळ्यांच्या डोळ्यात तेच दिसायला लागलं - 'बापरे किती कुरुप आहे ही!' तिचा चेहरा जास्तच काळवंडायला लागला. आरशात पूर्ण चेहऱ्याकडं लक्ष न देता भराभर ती आपलं प्रसाधन आटोपायला लागली. आरसा तिचा वैरी झाला. आणि हजारो आरसे डोळ्यांमध्ये असलेल्या सगळ्या जगाचे डोळे आपण फोडून टाकावेत एवढी चीड आली तिला - फक्त बाबांचे सोडून!

कारण बाबांच्या डोळ्यात तिच्या कुरुपपणाविषयीची कीव कधीच दिसली नाही. तशी ती बाबांवरच गेली होती ना! आणि मनोज आईवर. गोरा, गोमटा, देखणा!

मग नववी ते बारावी, तिचा कुरुपपणा जरी तसाच राहिला तरी तिच्या मनात तो वाढत गेला. तिचे खांदे झुकले. तिच्या चेहऱ्यात खरं तर तिचे मोठे विस्फारलेले डोळे आणि तिचं झगझगीत पांढरं शुभ्र स्मित या दोन्ही गोष्टी खूपच सुंदर होत्या. पण तिच्या मनातल्या स्वतःच्या चित्रात ते डोळे आकसून बारीक झाले. इतक्या दुष्ट जगाकडं इतकं सुंदर स्मित फेकायला तिच्या अंतर्मनानं मनाई केली. तोंड, ओठ, कडवट झाले आणि आपल्याला ड्रॅकुला सारखे सुळे आहेत असा भास तिला होत राहिला आणि स्वतःच्या मनात कुरुप झाल्यानं ती बाहेरदेखील आणखीनच कुरुप दिसायला लागून तिनं मनात स्वतः बरोबरच असल्याची खात्रीच स्वतःला दिली.

पण मग गव्हर्नमेंट इंजिनिअरिंग कॉलेजला तिला सहज प्रवेश मिळाला आणि ती किंचित सरळ झाली. कुबड किंचित कमी झालं. मग कॉलेज व्यवस्थित सुरू झाल्यावर दराडेसरांनी तिच्या लीडरशिप क्वालिटीज पाहून तिला प्रोत्साहन दिलं. गॅदरिंग, मॅगेझीन, यूथ फेस्टिवल, रेगाटा, बोटिंग, डायमंड स्कलपर्यंत सगळ्या बोटी चालवायला शिकणं, लायब्ररी, इंटरनेट, प्रोजेक्टस, टेस्टस्, परीक्षा, प्रॅक्टिकल्स, ओरल्स, पुरुषोत्तम, फिरोदिया, नाटकं, गाणी, दारू पिण्यातली नशा, स्मोकिंग, दोन-चार वेळा हॅश आणि होळी-शिवरात्रीला भांग, गोल्डमेडल, बक्षिसं, स्पोर्टस - ती बास्केटबॉल फार छान खेळायची- मेडल्स, ट्रॉफीज- ती चार वर्ष कशी गेली ते कळलं नाही! कॉलेजभर ती फेमस! कॉलेजभर कसली - पूर्ण पुणे - पूर्ण महाराष्ट्रात!

ती चार वर्ष उलटली आणि ती पुन्हा सुंदर झाली. तिचा कुरुपपणा लोपला. तिचा भाऊ मनोज मात्र डोनेशन देऊन खासगी कॉलेजात! आणि तिचा अगदी शत्रू बनलेला. तिची मुंबईला दोन वर्षं नोकरीची झाली - त्यावेळी मनोजपण इंजिनिअर झाला अन् त्याच वेळी बाबा अचानक आजारी पडले आणि दोन आठवड्यात वारले. बाबांचे अंत्यविधी आटोपून दराडेसरांना भेटून ती पुन्ही मुंबईला. बाबा असेपर्यंत सारखे ते मीनलच्या लग्नाचा प्रयत्न करत असायचेच! आता मनोज आणि आईनं तो प्रयत्न 'ऑफिशियली' पूर्ण बंद करून टाकला आणि आईनं घरी आता सून आण म्हणून धोशा लावताच वर्षभरात मनोजचं लग्न झालंसुद्धा! लग्नाच्या समारंभातच मीनलच्या नव्या वहिनीनं एकदा नाही तर सातदा तिचा असा अपमान केला की जणू मनोजच तिच्या तोंडून बोलतोय! पण मीनल शांतपणे थांबली. पूर्ण समारंभात आणि आधी जी ठरवली होती ती पन्नास हजार रुपयांच्या बाँडसची भेट त्याला देऊन तिनं ते पुण्याचं घर सोडलं, ते मनातल्या मनात पुन्ही तिथं कधीही न येण्याचा निश्चय करूनच.

स्वयंवर! स्वतःसाठी वर शोधणं! दोन वर्षं तिनं स्वतःसाठी वर शोधण्याचा पद्धतशीर प्रयत्न केला. वधू-वर सूचक, इंटरनेट, मॅट्रिमनी साईटस वगैरे. सातव्या नियोजित वराच्या नजरेतदेखील तिला आपल्या कुरुपपणाविषयी कणव दिसली तेव्हा तिनं तो प्रयत्न सयोडून दिला.

वैवाहिक आणि कौटुंबिक सुख आपल्यासाठी नाही, याची घट्ट गाठ मनाला बांधली आणि तिचं कुबड पूर्ण नाहीसं झालं. पण मग आज काय झालं होतं?

खरंच, आज काय झालं होतं? ती पुन्ही कुब्जा कशी बनली होती? अरुण दामलेच्या बोलण्यानं? की तो 'रवींद्र'शी ते बोलत होता म्हणून? का त्या मूर्ख दामलेच्या बोलण्यात थोडंफार तथ्य होतं म्हणून? नाही, त्याच्या बोलण्यात काही तथ्य नव्हतं! ओ माय गॉड! तिनं स्वतःला सांभाळायला पाहिजे होतं.

रवींद्र! त्यांच्या ऑफिसात जॉईन झालेला नवीन प्रोग्रामर! 'पर्ल' या कॉंप्युटर भाषेमध्ये प्रोग्रॅमिंग करण्यात मीनलचा हात धरणारं कुणीच नव्हतं. आणि हा रवींद्र घाटणे 'पर्ल' भाषेतल्या प्रोग्रॅमिंगसाठीच घेतलेला होता. रवींद्रची अन् तिची ओळख करून दिली होती आणि सुरुवातीला त्याचं काम समजावून सांगण्याची जबाबदारी तिच्यावर टाकली होती. रवींद्रला पाहताच तिला कुठंतरी छान, उबदार वाटलं होतं. कुरळे केस, खूपच काळा रंग, जाड ओठ आणि अगदी तिच्यासारखा आणि तिच्या बाबांसारखा कुरुप? पण नाही, तो तसा कुरुप नव्हता–फक्त काळा होता. इतकंच! कमावलेलं शरीर आणि खरं तर जाड ओठ सोडल्यास देखणा चेहरा! हसरा! अगदी कृष्ण! नाही तरी कृष्ण होताच नं काळा!

लंचला मिनी, भारती, मीता, रेवती सगळ्या जणींनी रवींद्र काळा असूनही सेक्सी असल्याचं सर्टिफिकेट दिलेलं मीनलनं ऐकलं. मिनी तर 'उस पर मर – मिटी' थी!

मीनलनं त्याला दोन कॉंप्युटर प्रोग्रॅम्स चेक करायला दिले. तर त्यानं अर्ध्या तासातच त्यात येणाऱ्या सहा वॉर्निंग्ज नाहीशा करून एकही एरर नसलेले, एकही वॉर्निंग नसलेले अगदी स्मूथली रन होणारे दोन्ही प्रोग्राम तिला परत दिले. ती चकित झाली. मग दोघांच्या पर्ल प्रोग्रॅमिंगविषयी गप्पा झाल्यावर आपल्याला याच्याकडून बरंच शिकता येईल असं मीनलला वाटलं.

आणि आज –

आज ऑफिसात कॉरिडॉरमधून वळताना अचानक काचेच्या तावदानापलीकडं तिला दामले आणि रवींद्र यांच्या संभाषणात आपलं नाव ऐकू आलं म्हणून ती थबकून ऐकत राहिली. अरुण दामले म्हणजे महा हरामखोर मनुष्य. इतक्या सडक्या मनाचा मनुष्य शोधूनदेखील सापडणार नाही, अशी त्याची ख्याती.

''कुब्जा आहे ती, कुब्जा! जरा सांभाळून! तुला लग्नाच्या जाळ्यात फसवायचा प्रयत्न करेल! अन् बॉसच्या पूर्ण विश्वासातली आहे, मखीजा साहेबांच्या! मखीजावर पूर्ण होल्ड आहे सालीचा! माझं मागच्या वेळी यू.एस.ला डेप्युटेशनवर जायचं ठरलेलं ऐनवेळी हिनंच कॅन्सल करवलं! तू नवीन आहेस नं, म्हणून सांगतोय!''

''ओऽ..! हं! थँक्स दामले, आय विल टेक केअर!''

मीनल जागच्या जागीच गोठली. तिच्या डोळ्यांपुढं अचानक तिला घाबरुन रडणाऱ्या शमिकाचा निरागस चेहरा आला. शमिकाचा आवाज कानात घुमला. ''मला भीती वाटते तिची!'' ती उलटी वळून आपल्या केबिनमध्ये सुन्न बसली. तिचा चेहरा काळवंडत गेला. पाठीवरचं कुबड भराभरा वाढलं. खांदे समोर ओढले गेले. ओठ पिळवटून तोंड वाकडं झालं, सुळे बाहेर आले आणि घरी आल्यावर आपल्या सोनाक्षीबरोबर शेअर केलेल्या फ्लॅटमधल्या ड्रेसिंग टेबलसमोर ती आरशात पाहात उभी होती, तेव्हा ती पूर्णपणं कुब्जा बनलेली होती.

चर्चगेटला ती लोकलनं कधी आली तिचं तिलाच आठवत नव्हतं. 'गेलॉर्ड' मध्ये जेवण घ्यावं का, असा विचार तिच्या मनात उमटला. तिच्या डोळ्यांसमोर एकाएकी सोनाक्षी दिसली. गोरी, गोमटी, सुंदर आणि तिचा मंगेतर वासू – वासुदेव – हसऱ्या चेहऱ्याचा, देखणा! जगातल्या सगळ्या सौंदर्याविषयी तिच्या मनात कडवट, उष्ण जाळ उफाळून यायला लागला– शेकोटीसारखा जळायला लागला! या विचारात मग्न असल्यानं तिला तो दिसला नाही– रवींद्र – समोरून येत असलेला. नाहीतर दुरुनच तिनं त्याला टाळायला ताबडतोब फुटपाथ बदलला असता.

***

आश्चर्य! अचानक मीनलला चांगलं वाटायला लागलं होतं. रवींद्रबरोबर गेलॉर्डमध्ये ती चायनीज जेवण घेत होती. आणि तो तिच्याशी धो धो बोलत होता. पहिल्या भेटीतच कशी वेव्हलेंग्थ जुळली ते सांगत होता. त्याचंही लग्न नव्हतं झालं. पण त्याला करायचं होतं.

'मी मूर्ख होतो,' तो सांगत होता, 'मी स्वतः कुरुप अन् काळा असल्यानं मला वाटायचं, सुंदर अन् गोरी बायको पाहिजे! म्हणजे मुलं निदान मध्यम प्रकारची होतील!'

मग तो गदागदा हसला. अन् मग एकदम आपण काहीतरी फारच एम्बरासिंग बोललो की काय म्हणून तिच्याकडं क्षमायाचनेनं पहायला लागला. तिनं आपलं झगझगीत स्मित देऊन त्याचं टांगणीला लागलेलं काळीज सोडवताच पुन्हा भडाभडा हसला आणि आवाज खाली घेऊन मंद स्वरात तिचा माहिती अतिशय आस्थेनं विचारायला लागला. तिनं एक जिमलेट व त्यानं ब्लडी मेरी घेतली असल्यानं अल्कोहोलचा डोळ्यात होणारा पारा दोघांच्याही डोळ्यात किंचितसा तरल तकाकत होता आणि मनावरचे निर्बंध सैल होऊन दोघंही सगळ्या गर्दीत स्वतःचा रेशमी कोष गुंफत होते. स्वतंत्र. गर्दीपासून अलाहिदा. ती संध्याकाळ मग रात्री साडेदहाला संपली. तिच्या फ्लॅटसमोर तिला तिच्या सोसायटीच्या पोर्चपर्यंत सोडून तो मग आपल्या घरी, आपल्या खोलीवर परत जाणार होता. टॅक्सीवाला टॅक्सी उलटी वळवून वाट पहात होता. सोनाक्षीनं दिलेले पैसे तसेच उरलेले. सगळा खर्च रवींद्रनं केलेला. वर फ्लॅटमध्ये दिवा दिसत नव्हता. म्हणजे सोनाक्षी आणि वासुदेव बाहेर गेले होते. तिला रवींद्रला फ्लॅटवर नेता आलं असतं. पण दोघे समोरासमोर उभे होते. मीनलला एकदम भीती वाटली. दामलेचा सडका सानुनासिक आवाज कानात घुमला – कुब्जा!

लहानपणापासूनची हेटाळणी, कीव, दया, तिरस्कार सगळ्यांचा डोंगर बनून कुबडाच्या रूपात पाठीवर वाढायला लागला. तिनं त्याच्या डोळ्यात नीट शोधून पाहिलं– नाही, हेटाळणी, कीव, दया, तिरस्कार काहीच नव्हतं त्या नजरेत. होती ती एक तहान. एक अनाथ तहान. तो कृष्णसखा होता जणू! आपोआप मीनल त्याच्याकडं ओढली गेली. पोर्चच्या कोपऱ्यात ती त्याच्या मिठीत स्वतःवरचा ताबा सोडून विसावली. त्यान एका हातानं तिच्या केशसंभाराला आधार दिला आणि दुसऱ्या हाताच्या तर्जनीनं तिची हनुवटी वर केली. ती बुटकी होती. ती एकाएकी उंच झाली. तिच्या डोळ्यात पहात तो कृष्णसखा तिची हनुवटी वरवर उचलत होता. तिच्या पाठीची कमान सरळ होत होत तिचं कुबड गळून पडलं. खांदे गर्वानं मागे घेत तिनं आपल्या तारुण्याच्या भार त्याच्या रुंद वक्षावर टाकला. आपोआप तिच्या हातांच्या सुंगधी वेली झरझर वाढून त्याच्या गळ्याभोवती लपेटल्या. तिच्या टाचा उंचावल्या, आणि मग तिचा जमिनीपासूनचा आधार पूर्णच सुटला आणि त्याचे उष्ण ओठ तिच्या थरथरणाऱ्या ओठांवर टेकले. तिच्या पापण्या झुकल्या आणि हातांची मिठी आणखी आवळली गेली.

ती कुब्जा नव्हती.

ती जगातली सर्वांत सुंदर स्त्री होती !

***

# महाजाल इंद्रजाल

''काय म्हणतात? महाजाल?''

''हो! इंटरनेटला मराठीत महाजाल म्हणतात!''

''गंमतच आहे!''

''हो, आणि वेबसाईटला संकेतस्थळ!''

''ओ होऽऽ! हाऊ रोमँटिक!''

''ते जाऊ दे, आता कर बरं टाईप, अन उघडून दाखव तुझं पेज फेसबुक वरचं! नायतं थांब, मी काँप्युटर पूर्णबंद करते, मग पहिल्यापासून काँप सुरू करून एफबी वरचा अकाउंट आणि स्वतःचं पेज उघडेपर्यंत सगळं जमलं पाहिजे तुला!''

''ठीक आहे.''

संगीता – म्हणजे स्पेलिंगमध्ये संगीथा – कारण ती आंध्रातली होती–पल्लवीवर खूष झाली. भराभर पल्लवीनं काँप ऑन करून गूगल क्रोम मधून एफबी वर लॉग ऑन केलं आणि शाबासकीसाठी एखाद्या हुशार विद्यार्थ्यानं मास्तरकडे पहावं तसं संगीताकडे पाहिलं.

''व्वाऽऽऽ! आणि मधेच मायक्रोसॉफ्टचे दोन शहाजोग मेसेज आले ते तू कोपऱ्यातली फुली क्लिकून घालवलेस ते तर फारच छान!''

''थँक्स!'' पल्लवी डोळे नाचवत म्हणाली. खूष झाली होती ती!

''हे पहा, आता डेस्कटॉपवरच्या या 'छाया' फोल्डरमध्ये आपण काही आयकॉन्स एकत्र केलेत, ते आता तुझ्या प्रोफाईल मधे टाकायचेत. हे बघ इथे 'सेटिंग्ज' लिहिलं आहे, ते क्लिक कर आणि मग....'' जवळ जवळ तास दीडतास पल्लवी शिकत होती आणि संगीता म्हणजे संगीथा – तिला शिकवत होती. होत्या दोघीही मास्तरणीच – शहरातल्या एका प्रसिद्ध शाळेत. पण आता एक बनली होती मास्तरीण आणि दुसरी तिची विद्यार्थिनी!

'फेसबुक' वर फेरफटका करायला लागल्यापासून पल्लवीचा एकलकोंडेपणा खूपच कमी झाला. तिने स्टेटस मुद्दामच ''कमिटेड'' असं घातलेलं होतं, संगीताच्या सल्ल्यानं. शिवाय नाव 'अनामिका' असं टोपण नाव ठेवलं होतं. प्रायव्हसीमध्ये फक्त 'मित्र' म्हणजे 'फ्रेंड' म्हणून स्वीकारलेल्यांनाच तिची माहिती – म्हणजे प्रोफाईल – पहायची परवानगी होती, पण पत्ता आणि इतर माहिती पहायची कुणालाच परवानगी नव्हती. म्हणजे अगदी पारखून घेतल्याखेरीज ती कुणाशी फार मैत्री करणार नव्हती. कारण तिच्या घटस्फोटानंतर पल्लवी तशी खूपच एकलकोंडी झालेली होती आणि गेली आठ वर्ष ती एकटी राहात असल्यानं आणखीनच स्वयंकेंद्रित झाली होती.

पण सहा महिन्यांपूर्वीच संगीथा उर्फ संगीता नावाचं एक उत्साही वादळ त्यांच्या शाळेत दाखल झालं आणि शेवटी अगदी पल्लवीचा देखील नाईलाज होऊन तिला आपल्या कोषातून बाहेर यावं लागलं. संगीता होतीच तशी! विद्यार्थ्यांपासून कॉलेजच्या प्रिंसिपॉल दारव्हेकर मॅडमपर्यंत सगळ्यांना तिनं कसं आणि केव्हा आपल्या उत्साहात सामील करून घेतलं कुणाला कळलंसुद्धा नाही. मग सगळ्यांशी तुटकपणे वागणारी पल्लवी देखील तिच्याशी नीट बोलायला लागली आणि त्या दोघीही लवकरच चांगल्या मैत्रिणी बनल्या. संगीता म्हणजे अगदी नवीनातल्या नवीन गोष्टींमध्येसुद्धा अगदी अद्यावत माहिती असलेली. तिनं ज्यांचे फेसबुक अकाऊंट नाहीत त्यांना रिकाम्या वेळात धरून त्यांच्या स्टाफरुममध्ये दोन इंटरनेटला जोडलेले कॉम्प्युटर्स होते तिथे नेऊन त्यांना मदत करत भराभर प्रत्येकीचे फेसबुकवर पेजेस करून दिले आणि शेवटी पल्लवीला देखील तिच्या प्रेमळ आग्रहामुळे मान तुकवावीच लागली.

पण इंटरनेटला मराठीत 'महाजाल' म्हणतात आणि वेबसाइटला 'संकेतस्थळ' हे ऐकून तिला अगदी पहिल्या क्षणापासूनच या सगळ्या उद्योगात खूपच रस वाटला. कॉम्प्यूटरवर पॉवर पॉईंट प्रझेंटेशन्स तयार करणे, वर्डमध्ये नोटीसेस, पत्र वगैरे छापणे, एक्सेलमध्ये रोल नंबर्स, नांवं घालून रिझल्टशीट्स बनवणे वगैरे कॉम्प्युटर्सची जुजबी ओळख तिला होतीच, त्यामुळे ती इंटरनेटवर सर्फिंग करायला भराभर शिकली – म्हणजे या 'महाजाला' चे धागेदोरे तिला सहजासहजी समजले. मग संगीताच्या आग्रहाखातरच तिनं संगीताच्या मैत्रिणीचा एक सेकंड हँड लॅपटॉप आणि वर्षभराचं वायरलेस ब्रॉड बँडचं कनेक्शन घेऊन टाकलं. त्यांची शाळा चांगली शहरातल्या प्रतिष्ठित शाळांपैकी होती. इंग्रजी माध्यमाची. बहुधा सगळ्या शिक्षिकाच होत्या. शिक्षक नावापुरतचे ७–८ जण.

तिनं फेसबुकवर स्वतःच पान बनवताच आठवडा भरातच तिला फ्रेंडशिप रिक्वेस्ट यायला लागल्या. बहुतेक सगळ्या तिच्या विद्यार्थिनी. त्यांच्या शाळेतून तिच्या हाताखालून चौथी–पाचवीतून गेलेल्या अन् आता कुठेतरी दुसऱ्या शाळेत किंवा कॉलेजात असलेल्या. क्वचित एकदोन विद्यार्थी, म्हणजे मुलं देखील. ती आपली सगळ्यांची मैत्री–विनंती भराभर 'ॲक्सेप्ट' वर क्लिक करून मान्य करायची आणि मग एका रात्री ती लॅपटॉप उघडून बसली होती. संगीताशी गप्पा झाल्या होत्या आणि ती तिच्या कलीग्जपैकी कोणी काय फोटो टाकलेत ते बघत होती. तिनं एक जांभई देऊन आता बास झालं. सकाळी उठायचंय. झोपायला पाहिले. म्हणून लॅपटॉप बंद करायची तयारी केली. एवढ्यात तिचं लक्ष नुकत्याच फ्रेंडशिप ॲक्सेपट केलेल्या तन्वी कामतच्या वॉलवर खिळून राहिलं. तिथे तन्वीच्या एका मैत्रिणीनं, चारुता आबनावेनं काहीतरी विनोदी व्हिडीओ टाकून कमेंट लिहीली होती.

चारुता.

पल्लवी बघतच राहिली.

तिच्या सगळ्या आठवणी जाग्या झाल्या.

चांगल्या आणि वाईट!

चांगल्या तशा कमीच, वाईटच जास्त! कारण चारुता आबनावे तिची मुलगी होती! तिचा नवरा संजय आबनावे! आणि त्यानं घटस्फोट होतांना तिची चारुता तिच्याकडून हिरावून घेतली होती. चारुताची कस्टडी त्याला मिळाली होती! त्यावेळी तिला त्याचं काही वाटलं नव्हतं. कधी कल्पनाही केली नाही अशा घटस्फोटाला सामोरं जावं लागल्यामुळे आणि तो निर्णय तिनंच नाईलाजानं घेतल्यामुळे तेव्हा ती अगदी ढासळून गेली होती. तिला आपण मुलीची जबाबदारी नीट पार पाडू की नाही याची शंका देखील होती! तो काय– तो घरचा खूप श्रीमंत होता, फक्त तिच्या प्रेमात पडल्यानं त्यानं तिच्याशी आपल्या आईच्या मर्जी विरुद्ध लग्न केलं होतं आणि लग्नानंतर पल्लवीला आपल्या सासूचं घरात केवढं प्रस्थ आहे हे कळलं होतं. संजयला वाटलं होतं की आईनी, म्हणजे मालती बाईनी पल्लवीला स्वीकारलंय, पण मालती बाईचा विक्षिप्त स्वभाव त्याला लहानपणापासून त्यांच्या देखरेखीखालीच वाढल्यामुळे कधी जाणवायचा देखील नाही – नव्हे, तो विक्षिप्तपणा त्याच्यात देखील थोडाफार उतरला होता.

पण नंतर एकटी रहात असतांना तिला सारखं वाटायचं की आपण मुलीवरचा आपला हक्क उगीच सोडला!!

तिनं चारुताचं पान उघडलं. तिच्या प्रोफाईल वरून चारुताला एक फ्रेंडशिप रिक्वेस्ट पाठवली, आणि लॅपटॉप बंद करून दिवे विझवून, फ्लॅटचं दार नीट लागलंय याची खात्री करून ती झोपली –पण तिला झोपच लागेना! संजय बरोबरचं पहिलं मोठं भांडणच तिच्या डोळ्यापुढे तरळत होतं! या भांडणापासूनच संजय बाबतचा तिचा भ्रमनिरास व्हायला सुरुवात झाली होती!

पल्लवीचे डोळे रडून लाल झाले होते. ती संजय ऑफिसमधून परत येण्याची वाट पाहत होती. चारुता थोडंसं रडून झोपून गेली होती. आज सकाळी ऑफिसला जातांना पल्लवी संजय आणि चारुता याचं हसणं खिदळणं पाहून मालती बाईंच्या कपाळावर आठ्या पडल्या होत्या. संजयच्या लग्नानंतर त्यांचा आधीचा विक्षिप्त स्वभाव आणखी विचित्र झाला होता. संजयला पहिली मुलगी झाली म्हणून हा राग होताच. कारण सोनोग्राफीमधून मुलगा की मुलगी सांगायला, आणि मुलगी असली तर 'गर्भामुळे आईच्या जिवाला धोका' असं प्रमाणपत्र देऊन गर्भपात करायला मालतीबाईंच्या ओळखीचे एक डॉक्टर तयार होते. पण याला पल्लवी तयार नव्हती आणि पहिल्यांदा संजय नं देखील आईच्या 'हो' त 'हो' मिळवली आणि तिला मालतीबाईचं म्हणणं तिनं ऐकावं असं सागितलं तेव्हा ती तर आश्चर्यानं थक्कच झाली! हा तिचा प्रियकर संजय नव्हता. वेगळाच कुणीतरी होता – हा तिचा नवरा होता. त्या कामवाल्या बायका काय म्हणतात नवऱ्याला?

बरोबर! मालक! हा तिचा मालक होता. धनी? बरोबर! हा तिचा मालक, तिचा धनी होता आणि ती त्याच्या मालकीची एक वस्तू होती. निर्जीव. प्रियकर आणि नवरा दोघांमध्ये इतका फरक असतो? प्रियकराचा नवरा झाल्यावर त्याच्यातली माणुसकी नष्ट होऊन जाते? की पुरुषाच्या मनात ती कधी नसतेच? की या पुरुषप्रधान समाजानं ती पूर्णपणे ठार करून टाकली असते? पण ती जेव्हा उफाळून संजयला 'हेच तुझं प्रेम का?' म्हणून विचारायला लागली तेव्हा मग तो जरा शुद्धीवर आल्यासारखा झाला आणि त्यानं तिला त्या सोनोग्राफीसाठी जबरदस्ती केली नाही. इतकंच! पण तेव्हापासून त्यांचा एकत्र जुळलेला स्वर बिघडला तो बिघडलाच!

चारुताच्या जन्मानंतर मात्र संजय आणि पल्लवीच्या संबंधामधला रुक्षपणा कमी होत गेला. लहानशा चारुतानं मोठी होता होता एक वेगळंच विश्व स्वतःभोवती निर्माण केलेलं होतं. त्यात संजय गुंतून जात होता आणि ते मालती बाईंना सहन होत नव्हतं. संजयचे वडील त्याच्या लहानपणीच वारलेले असल्यानं त्यांच्यानंतर संजय पूर्ण शिकून अगदी एम.बी.ए. होईपर्यंत मालतीबाईंनी त्याला अगदी आपल्याशी बांधून ठेवलेलं होतं. संजयच्या वडिलांच्या सर्व उद्योगाची विक्री करून संजयच्या एका दूरच्या काकांनी सर्व संपत्ती स्थावर आणि जंगम स्वरूपात मालतीबाईंच्या नावे करून दिली होती. त्याचं व्याज सुद्धा खर्च करणं कठीण होतं इतकी ती संपत्ती होती आणि त्यावरच सगळं चाललेलं होतं. संजय कॉमर्स ग्रॅज्युएट आणि नंतर एम.बी.ए. झाला तेव्हा त्याच्या काकांनी ''आबनावे एंटरप्रायझेस'' ही केमिकल फॅक्टरी तेवढी विकली नव्हती, ती संजयच्या ताब्यात दिली. पण संजय कधी ती नीट चालवू शकला नव्हता. सारखे काही तरी प्रॉब्लेम्स येत होते. मालतीबाई संजयला सतत ती फॅक्टरी विकून भोसले बिल्डर्सच्या चंद्रकांत भोसलेंच्या मुलीशी, मनीषाशी, लग्न करून आपल्या तशाच पडलेल्या जमिनीवर भोसलेंच्या मदतीनं फ्लॅट्सच्या स्क्रीम्स सुरु कर म्हणून तगादा करत असत आणि संजयला हे मुळीच नको होतं. एक तर त्याला चंद्रकांत भोसले हा माणूस बिलकुल आवडायचा नाही. आणि मनीषा ही दहावीतच दोनदा नापास होऊन शिक्षण सोडलेली आणि पूर्ण बिघडलेली मुलगी होती. दिसायलाही ती चांगली नव्हती आणि तिच्याविषयी प्रवाद देखील खूप होते. मग कुठल्यातरी एका लग्नात संजय आणि पल्लवीची गाठ पडली आणि ते दोघे एकमेकांना खूपच आवडले आणि अगदी चित्रपटात दाखवतात तसे दोन चार योगायोग अक्षरशः घडले आणि लागोपाठ त्यांची एकमेकांशी भेट होत राहिली आणि त्यांनी एकमेकांशी लग्न करायचं ठरवलं. आणि मालतीबाईंना जेव्हा कळलं की आता आपला मुलगा काही आपलं ऐकणार नाही, तेव्हा त्यांनी ते लग्न धडाक्यात भरपूर पैसा खर्चून आबनावेंच्या श्रीमंतीला शोभेशा थाटात पार पाडलं. पण मनातल्या मनात त्यांनी ठरवलं होतं, की बघू ही पल्लवी कशी टिकते, मी हिला हाकलणारच माझ्या घरातून बाहेर! त्यांचा पहिला डाव वाया गेला होता, पल्लवीनं चारुताला जन्म दिला होता आणि संजय-चारु-पल्लवी पुन्हा जरा सुखी व्हायला लागले

होते आणि त्यादिवशी त्यांनी मग आपला दुसरा डाव सुरु केला होता. त्यांनी सकाळपासून पल्लवीशी भांडण सुरू केलं होतं. मुद्दा त्यांनी आधीच बऱ्याच वेळा उगाळलेला होता, की तुम्ही चारुताला बिघडवता आहात. लहान मुलांना आधीपासूनच शिस्त लावली पाहिजे, त्यांना हट्टी बनू देता कामा नये! त्यादिवशी पल्लवी आली आणि तिला चारुता कुठे दिसेना! मालतीबाई टी.व्ही. वर कुठलातरी 'धर्म' चा चॅनेल पाहत बसलेल्या. कुठलातरी महाराज काहीतरी पिवळ्या कपड्यात गुंडाळा, पाण्यात वाहवून टाका – अकरा गोमतीचक्र आणा. पिवळी फुलं आणा – असलं काहीतरी सांगत होता. समोर मालतीबाईंची वही आणि पेन होतं. काही स्वतःला पाहिजे असलेलं अशा धर्म वगैरे चॅनेल्स वर आलं की मालतीबाई ते वहीत लिहून घ्यायच्या. चोवीस तास घरकामाला असलेली शेवंताबाई सकाळीच मोठी लिस्ट घेऊन, जातांना दळण टाकून, मग मॉल मध्ये खरेदी करायला गेली होती ती अजूनही परत आलेली दिसत नव्हती.

''आई चारुता कुठे आहे?'' पल्लवीनं विचारलं. मालतीबाईंनी उत्तरच दिलं नाही.

''आई, चारुता कुठे गेलीय? शेजारी खेळायला तर तुम्ही पाठवलं नाही नं?''

''नाही.''

''मग कुठे आहे ती?''

मालतीबाई काहीच बोलल्या नाहीत. त्यांनी फक्त टीव्हीचा आवाज वाढवला. पल्लवी अस्वस्थ झाली. हॉलमधून बंगल्याच्या समोरच्या व्हरांड्यात आली आणि तिला चारुताच्या रडण्याचा अस्पष्ट आवाज दुरुन आल्यासारखा वाटला. तिला वाटलं आपल्याला भास तर होत नाही ना? पण पुन्हा तोच आवाज! अन् मग एकदम तिच्या लक्षात आलं. व्हरांड्याला लागून डाव्या बाजूला असलेल्या जिन्यानं ती दडदडत गच्चीवर चढू गेली. गच्चीच्या दरवाजाला बाहेरून कडी होती, आणि त्या दरवाज्या मागून चारुताच्या रडण्याचा आवाज येत होता! पल्लवी दरवाजाची कडी उघडून धावतच गच्चीवर गेली. पाण्याच्या टाकीपाशी काँक्रीटच्या तीन पायऱ्या बांधलेल्या होत्या, त्यावर चारुता उन्हात रडत होती.

''चारुताऽऽ!'' पल्लवी ओरडली, त्याबरोबर चारुतानं वरं पाहिलं आणि ती धावत येऊन आपल्या आईला बिलगली. ''काय झालं बेटा? काय झालं?'' पल्लवीनं तिला उचलून घट्ट छातीशी धरून तिचे डोळे पुसत म्हटलं.

''आजीनी मला वरती कोंडून ठेवलं! मी चॉकलेट खाणार होते. आजीला मागितलं तर तिनं दिलं नाही. म्हणून मी खुर्ची फ्रीजजवळ नेऊन फ्रीज उघडायला गेली तर आजीनं मारलं, अन् मला दंडाला धरून ओढत वर आणून अर्धातास उन्हात बसायची शिक्षा म्हणून गच्चीवर कोंडून ठेवलं!''

चारुतानं रडत रडत तुटक तुटक सांगत आपली हकीकत पूर्ण केली. तोपर्यंत पल्लवी चारुताला छातीशी घट्ट चिकटवून आपल्या खोलीत गेली होती, आणि तिनं दार आतून लावून घेतलं होतं. चारुताच्या गोऱ्यापान दंडावर गच्च धरून ओढल्यामुळे दोन निळसर वण पडलेले होते. पल्लवीनं त्यावर आयोडेक्स हळुवारपणे लावून चारुताला शांत करून झोपवलं आणि मग ती बाहेर गेली. आपल्या खोलीचं दार ओढून.

ती हॉलमध्ये गेली आणि तिनं टी.व्ही. च्या मागे जाऊन प्लगशेजारचं बटन बंद करून टीव्ही बंद करून टाकला. मालतीबाई धाडकन सोफ्यावरून उठल्या आणि पल्लवीजवळ आल्या. तिनं काही न विचारताच म्हणाल्या,

''काही चुकलं नाही माझं. चारुचा हट्टी स्वभाव बदलायलाच हवा. आता काही चॉकलेट खाण्याची वेळ नाही. तिनं मी सांगितलेलं ऐकायला हवं होतं.''

''पण म्हणून तिला अर्धा तास इतक्या कडकं उन्हात नेऊन बसवायचं? तिला असं दरादरा ओढत न्यायचं? आई तुम्ही तिच्या दंडावरचे निळे वळ पाहिले तुमच्या बोटांचे?''

''हे बघ पल्लवी, एकदा अशी शिक्षा दिली की ती सुधारेल. टीव्ही सुरु कर मुकाट्यानं!''

पल्लवी विस्फारलेल्या डोळ्यांनी मालतीबाईंकडे बघतच राहिली. ''टीव्ही सुरु कर म्हणून सांगितलं नं तुला?'' मालतीबाई विचित्र आवाजात ओरडल्या.

''नाही करत!'' पल्लवी म्हणाली,

''त्याबद्दल मला काय शिक्षा देणार तुम्ही?'' ती तिरस्कारानं थुंकल्यासारखी बोलली. मालतीबाई पुढे झाल्या आणि त्यांनी एकाएकी हात उगारून खाऽड्कन पल्लवीच्या गालफडात एक जोरदार थप्पड लगावली आणि टीव्हीचं भिंतीवरचं स्विच ऑन करून त्या पुन्हा शांतपणे सोफावर जाऊन बसल्या.

''....ऐसा करनेसे घरमें सुखशांती प्रस्थापित होगी. जय विंध्यवासिनी!''

टीव्हीवरचा महाराज एकाएकी मोठ्या आवाजात सांगायला लागला. भयचकित झालेली पल्लवी आतल्या आपल्या खोलीत पळाली आणि दार आतून लावून घेऊन हुंदके देत पलंगावर कोसळली. तिनं निरागसपणे झोपलेल्या चारुताच्या मऊ गालावर हात फिरवला आणि ती संजय परत येण्याची वाट पाहत रडत राहिली. ती मनातल्या मनात काहीतरी पक्कं ठरवत होती.

संजय संध्याकाळी आला आणि सगळं त्यानं शांतपणे ऐकून घेतलं. पण आपल्या आईला काही सांगण्याचं त्यानं स्पष्टपणे नाकारलं. ''हे पहा, आईचं अन् तुझं काय भांडण असेल ते तुमचं तुम्ही सॉर्ट आऊट करा! मी काही मध्ये पडायला तयार नाही!''

''संजय! तू काय म्हणतोयस? तुझं माझ्या सांगण्याकडे लक्ष नाही का?''

''माझं लक्ष वगैरे आहे. पण तू म्हणतेस तसं वेगळं राहणं मला शक्यच नाही?''

''मग निदान चारुताच्या पालनपोषणात आईंनी थोडाही हस्तक्षेप करायचा नाही हे आईंना मान्य करायला लाव!''

''अग शेवटी ती देखील आजी आहे चारुची! लहानपणीच थोडी शिस्त लावली तर ते काही वाईट नाही!''

''हो! आजी म्हणे! गर्भावस्थेतच चारुला मारायला टपलेल्या होत्या त्या! मी खंबीर होते म्हणून ते जमलं नाही!''

''हे पहा, उगीच कटकट करू नकोस! आधीच त्या फॅक्टरीत गोंधळ चाललाय सगळा, अन् घरी पण कटकट मला नकोय. निदान घरी तरी मला जरा शांतपणा हवाय! दरवर्षी तोटा वाढतच चाललाय, अन् तो हरामखोर भोसले बिल्डर मला मुद्दाम अडचणीत आणायला पाहतोय सगळीकडून!'' संजय म्हणाला, ''कुठून लग्न केलं असं झालंय मला!'' तो तोंडातल्या तोंडात पुटपुटला, पण ते पल्लवीनं ऐकलंच!

असं तिचं संजयशी झालेलं पहिलं मोठं आणि गंभीर भांडण! त्या भांडणापासूनच तिचा संजय बाबातचा भ्रमनिरास तर झाला होताच, पण ती मनानं अगदी सुन्न होऊन गेली होती. ते भांडण तिच्या डोळ्यासमोर तरळत असतांनाच आता १५ वर्षांची झालेली चारुता तिच्या डोळ्यांसमोर आली. फेसबुकवरचा तरुण चारुताचा गोड चेहरा तिच्या डोळ्यांसमोर आला आणि तिला बरं वाटलं. मग हळूच ती गाढ झोपेत बुडाली!

त्यानंतर बरेच दिवस मालतीबाई शांत होत्या. पण पुन्हा एकदा त्यांनी पल्लवीशी काहीतरी कुरापत काढून भांडण उकरून काढलं आणि त्या भांडणातच पल्लवीनं त्यांच्या आरोपांना उत्तर देताच तिच्यावर हल्लाच चढवला. तिचा हात मुडपून पाठीवर पिरगाळला आणि तिच्या गालफाडात दोन-चार थोबाडीत ठेवून दिल्या. पल्लवी सुन्न झाली. संध्याकाळी संजयला सांगितल्यावर त्यानं पुन्हा तुमची दोघांची भांडणं तुम्हीच सोडवा, मी मध्ये पडणार नाही. ही जुनीच रेकॉर्ड वाजवली. वेगळं राहण्याचा तिच्या प्रस्तावाला देखील अगदी स्पष्ट नकार दिला. पल्लवीचे आई-वडिल नव्हतेच. तिच्या लहानपणीच गेलेले होते. तिच्या एका काकांनी तिला व तिच्या भावाला वाढवलं होतं. तो भाऊ ऑस्ट्रेलियात स्थायिक झाला होता.

या भांडणानंतर पल्लवी निराशेच्या खोल गर्तेत कोसळली. तिची अवस्था भ्रमिष्टासारखी झाली. काहीही बोललं तरी तिचं लक्ष नसायचं. चारुताची सुद्धा ओळख तिच्या नजरेत दिसेनाशी झाली. मालती बाईंनी संजयचे कान चांगलेच फुंकले आणि जर त्यानं पल्लवीला घटस्फोट दिला आणि अजूनही बिल्डर भोसलेंच्या मुलीशी लग्न केलं तर सगळे त्रास कसे संपतील ते त्याच्या लक्षात आणून दिलं. संजयनं शेवटी-''कर तुला काय करायचं ते!'' -म्हणून वैतागून

संमती दिल्याबरोबर मालतीबाईंनी पल्लवीच्या ऑस्ट्रेलियातल्या भावाला बोलावून घेतलं. पल्लवीची भ्रमिष्ट अवस्था पाहून तो देखील हादरला. त्यानं घटस्फोटाला काही हरकत घेतली नाही. पल्लवीला बरं करणं एवढंच त्याला महत्त्वाचं वाटत होतं. तो तिला घेऊन तडक ऑस्ट्रेलियाला गेला आणि मग तिथे मानसोपचार तज्ज्ञाकडे योग्य उपचार घेताच पल्लवी पुन्हा पूर्ववत झाली, तेव्हा तिनं तिच्या भावाला खरी हकीकत सांगितली. पण तोपर्यंत घटस्फोट – दोघांच्याही संमतीनं होऊन गेला होता आणि वरकरणी परिस्थिती अशी दिसत होती की चारुताची कस्टडी संजयलाच देणं योग्य वाटावं ! आणि त्या वेळची लहानशी चारुता आता दहावीत शिकत असतांना पल्लवीला ती 'फेसबुक' वर भेटली होती !

पल्लवीची 'फ्रेंडशिप रिक्वेस्ट' चारुतानं लगेच मान्य केली. संजय आबनावे आता मुंबईला गेला होता. मालतीबाई वारलेल्या होत्या आणि चारुताच्या आईचं माहेरचं आडनाव भोसले होतं! कोड्याचे सगळे तुकडे कसे एकमेकात अगदी चपखल बसले होते! तुटलेले धागे या 'महाजाला'त कसे अगदी बेमालूम पुन्हा सांधले गेले होते! घटस्फोटानंतर आणि ऑस्ट्रेलियाहून पूर्ण बरी होऊन परत आल्यानंतर पल्लवीनं शाळेत शिक्षिकेची नोकरी धरली होती आणि लग्नाआधी देखील ती तशी आर्थिकदृष्ट्या चांगली होतीच! शिवाय ऑस्ट्रेलियातल्या भावाची मदत होतीच! त्यामुळे पल्लवीनं संजयचं पुढे काय झालं याची थोडी देखील चौकशी केली नाही आणि आता मात्र ती चारुताशी अगदी सावधपणे मैत्री वाढवत होती तेवहा तिला हळूहळू मधे काय झालं ते कळत होतं! पण लहानपणी आपल्याला वेगळी कुणी आई होती, हे चारुताच्या आठवणीत देखील नव्हतं आणि आपली आताची आई ही आपली खरी आई नाही, हे तिला माहितच नव्हतं! चारुता आणि पल्लवी यांची 'फेसबुक' वरची मैत्री वाढतच राहिली. नंतर त्यांनी एकमेकींचे ई–मेल ॲड्रेसेस घेतले आणि दोघीही एकमेकांना लांबलचक पत्रं लिहायला लागल्या. चारुताची पत्रं वाचून पल्लवीला तिच्यात आपलं प्रतिबिंब पाहिल्यासारखं वाटायचं. चारुताला देखील पल्लवी खूप आवडायची. तन्वी–जिच्यामुळे पल्लवीला चारुताचं नाव आणि चेहरा अचानक संगणकाच्या पडद्यावर दिसला होता– त्या तन्वीला देखील खूप आश्चर्य वाटायचं. ती चारुताला विचारायची पण, की मित्र–मैत्रीणींशी जरा रिझर्व्हड् राहणारी, जरा अलिप्तच राहणारी चारुता या पल्लवी मॅडमशी इतकी सलगीची दोस्ती कशी करू शकतेय? त्यावर चारुता म्हणायची,

''कोण जाणे! मला एकदम पाहिल्यावरच पल्लवी मॅम खूप आवडल्या होत्या तुझ्या!'' मग दहावीच्या परीक्षेच्या सुट्टीनंतर तन्वीचा आठवडाभरासाठी पुण्याला येण्याचा बेत ठरला आणि पल्लवी मॅमला भेटायला मिळेल म्हणून चारुतानं पण पुण्याला येण्याचं ठरवलं. तसं तिनं पल्लवीला कळवताच आपल्याला आपली छोटीशी चारू परत भेटणार म्हणून पल्लवी अगदी हरखून गेली! गच्चीवर उन्हात रडत बसलेली आणि तिनं गच्चीचं दार उघडताच धावत येऊन रडत रडत

तिला बिलगलेली चारु! हीच चारुताची आठवण तिच्या मनात रुतून बसलेली होती. त्यानंतरच्या तिच्या चारुताच्या प्रत्यक्षातल्या आठवणी अगदी कोऱ्या होत्या!

ते चार दिवस पल्लवी जणू स्वर्गात होती. आपलं रहस्य तिनं फक्त आपली जिवलग मैत्रीण संगीता हिला सांगितलं होतं. शाळेतून चार दिवस सुट्टी घेतली होती. चारुताच्या पुण्याच्या आठवडाभराच्या मुक्कामात तीन दिवस ती तन्वीच्या नातेवाइकांबरोबर राहिली असली, तरी उरलेले चार दिवस पल्लवी बरोबर राहिली होती. दोघी मिळून सिंहगडला गेल्या होत्या, भाड्यानं कार घेऊन. एक दिवस महाबळेश्वर पाहिलं. चारुताच्या आवडीचे पदार्थ पल्लवीनं तिला खाऊ घातले.

आणि या चार दिवसात पल्लवीला संजयच्या सध्याच्या स्थितीबद्दल सगळं कळत गेलं.

''बाबा किती, चांगले आहेत तसे, माझे सगळे हट्ट पुरवतात, पण खूप गंभीर आहेत!''

''गंभीर?''

''हां! म्हणजे तसे गंभीर नाहीत, पण हसत नाहीत कधीच!''

''आणि आई?''

''आई तर काय खूपच बिच्चारी आहे. सारखी आजारी आजारीच असते!''

''हो? काय झालंय तिला?''

''मॅम, मला बाबांनी एकदाच नीट सांगितलं होतं. तिला किनी माझ्यानंतर बाळ होतांना कॅन्सर झाला होता, आणि तिचं गर्भाशय काढून टाकावं लागलं आणि मग केमोथेरपी का काय म्हणतात नं, त्यामध्ये तिला खूप त्रास झाला आणि ती खूप जाडी झाली. तिच्या स्किनवर पण खूप डाग पडले, आणि थोडी हालचाल करून पण तिला धाप लागते!''

''अरेरे! बिच्चारी!'' पल्लवी कळवळून म्हणालीख

''हो नं! बाबांनी मला हे सगळं सांगितलं नं तेव्हापासून मी खूप काळजी धेते तिची! बिच्चारी! नाहीतर आधी मी तिची नक्कल करून चिडवायची तिला! ती जेव्हा केव्हा ओरडायची नं, तेव्हा! पण आता किनी, ती पण माझ्यावर खूप प्रेम करते. माझे लाड करते! मी तिला जबरदस्तीनी फिरायला नेते. डॉक्टरांनी सांगितलेले व्यायाम करून घेते. गेल्या दोन वर्षात तिची प्रकृती पण खूप चांगली झालीय! पण जाऊ द्या नं मॅम, काय सिरीअस विषय काढलाय! आज आपण संध्याकाळी लांब कुठेतरी जाऊ! कॅंपात जाऊ या! आणि माझं शॉपिंग तर अजून राहिलंय!''

''अं! तू मुंबईची! तुला पुण्यात शॉपिंगला काय मजा येणार?''

''नाऽऽ ही! मॅऽऽम! मला खूप मजा येते! मला तुमच्याबरोबर शॉपिंगला तर केऽवढी मजा येईल! अन माहितीय? माझ्या एका मैत्रिणीनं मला कँपातल्या दोन-तीन दुकानांचे पत्ते दिलेत. तसलं काही मुंबईत मिळतच नाही! अरे हो! अन् कोरेगाव पार्कला जाऊन ओशो चप्पल पण घ्यायच्यात- चटई चप्पल्स! माहितीय? मी माझ्या चार मैत्रिणींना नक्की आणीन म्हणून सांगितलंय!''

''ओक्के बाबाऽ! जाऊया आपण! अन् मी तुला एक स्पेशल गिफ्ट देणार आहे!''

''नाही, नाही. मी नाही घेणार तुमच्याकडून.''

''का बरं? मी तुझी आई असती तर घेतली असती नं?''

''हो! पण तुम्ही कुठे माझी आई आहात?''

''समज, आईसारखीच आहे म्हणून!'' पल्लवी आवंढा गिळत म्हणाली.

''ओके, ओके'', चारुता आपल्या नेहमीच्या स्टाईन नं म्हणाली.

त्यावर पल्लवीनं नेहमीचा विनोद केला,

''ओके ओके,
दूध पिऊन गेले
चार काळे बोके!''

आणि दोघी ही खळखळून हसल्या!

''पल्लवी मॅमकडे राहिलीस  कोण या पल्लवी मॅम?'' संजय नं आश्चर्यानं सुट्टीवरून परत आलेल्या चारुताला विचारलं.

''त्या नं, तन्वीच्या मॅम होत्या, ती पुण्याला शिकायला असतांना. मग फेसबुकवर तन्वीनं त्यांना पाहिलं, आणि मग आमची दोघांची पण त्यांच्याशी फ्रेंडशिप झाली. ''

''मला दाखवशील त्यांचा फोटो? फेसबुकवर?''

''ओके! ती तर त्यांची काय मिस्टरी आहे, कळत नाही! त्या फोटोच नाही टाकू देत फेसबुकवर! आणि पुण्यात आम्ही इतकी मजा केली, पण मला फोटोच काढू नाही दिले आपले. अगदी महाबळेश्वरला पण! मी चुपचाप काही काढले होते, तर एकदा माझ्या मोबाईलवरचे बाकीचे पाहतांना त्यांना दिसलेले, तर कसल्या चिडल्या त्या आणि मला शपथ घातली आपली! मग मी डिलीट केले सगळे आणि नंतर काढले नाहीत!''

''त्याचं आडनाव तरी माहितीय?''

''हो ऽऽ! पल्लवी दास्ताने!''

संजयचा संशय खरा ठरला. दास्ताने!

पल्लवी दास्ताने – नंतर पल्लवी आबनावे बनेलली आणि डिव्होर्स नंतर पुन्हा माहेरचं नाव लावणारी! चारुताची खरी आई!

काय करावं? तो अस्वस्थ झाला. पल्लवीला भेटण्याची तीव्र इच्छा त्याच्या मनात उफाळून आली. ती गेल्यानंतरचं आयुष्य म्हणजे तर एक रंगहीन, कळहीन चित्रच बनलेलं! एक कंटाळवाणी शिक्षाच बनलेलं! त्याला लग्नाआधीचे त्यांचे प्रेमाचे फुलपाखरी दिवस आठवले. त्याच्या मनात पुन्ही आशेची पालवी फुटली.

पालवी – पल्लवी!

पण पल्लवी जर फोटोबद्दल देखील इतकी काळजी घेत असेल तर जरा सांभाळूनच सगळ्या गोष्टी केल्या पाहिजेत!

काय करावं?

संजय विचारमग्न झाला.

मग हळूहळू त्याच्या मनात एक योजना तयार झाली.

''मला वाटतं तू त्याला एकदा भेटावंस.'' संगीथा– नाही– संगीता पल्लवीला म्हणाली.

''तू पण असं म्हणतेस? तुला इतकं सगळं समाजावून सांगितलं तरीही?''

''तो काय म्हणतोय ऐकून तर घे! थिंक पॉझिटिव्ह या ऽ र! काय म्हणता तुमच्या मराठीत! सकारात्मक विचार! बरोबर? ''

अन् शेवटी पल्लवीनं संजयला भेटायचं ठरवलं.

संजयला पाहून पल्लवी दचकलीच. केवढा बदलला होता तो! चारुता म्हणत होती ते खरंच होतं. हसणं जणू विसरुनच गेला होता तो! गंभीर झालेला होता. कपाळावर आठ्याचं जाळं. केस कपाळावरून खूप मागे गेलेले. वाढणारं टक्कल. झुकलेले खांदे आणि जगण्याची लढाई पूर्ण हरल्याचा एक पराभूत आणि केविलवाणा भाव.

पण पल्लवीला पुन्हा पाहून तो एकदम ताजा झाल्यासारखा वाटला. डोळ्यातली चमक पुन्हा परत आली. खांदे जरा सरळ झाले. कपाळावरच्या दोन आठ्या कमी झाल्यासारख्या वाटल्या. त्यानं मग आधी तर खूप वेळा तिची क्षमाच मागितली. पल्लवी आधीच मनाशी ठरवून आपलं मन अगदी घट्ट करून आली होती.

आपल्या आयुष्याचा नाश करणाऱ्या या राक्षसाला मुळीच दया दाखवायची नाही असं तिनं ठरवलं होतं. मग त्यानं चारुताची आणि तिची भेट कशी योगायोगानं झाली, आणि दैवात असतं ते कुणाला चुकवता येत नाही, असं एक लांबलचक व्याख्यानच लावलं. तिनं मुंबईला शिफ्ट व्हावं, असं तो सुचवत होता. तिची मैत्री झाल्यापासून चारुतामध्ये कसा फरक झाला आणि आधी

जरा गुर्मीत असलेली चारुता आता कशी आनंदी आणि हसती खेळती झाली याचं वर्णन तो करत बसला. तिची स्तुती करत बसला. ती अजूनही प्रतिक्रिया दाखवत नव्हती. पण संजयच्या बोलण्यावरून तो खरोखरच पश्चाताप दग्ध आहे हे अगदी स्पष्ट कळून येत होतं.

''मी मनीषाशी लग्न आईच्या सांगण्यावरून केलं. माझे सासरे – म्हणजे भोसले बिल्डर यांनी तर मला कचाट्यात पकडल्यासारखंच केलं होतं.'' संजय सांगत होता, ''मी मनीषाशी लग्न करणार हे तर आमच्या ओळखीचे आणि त्यांचे आणि आमचे नातेवाईक गृहीतच धरायचे! मग हिरेन कटारियाच्या म्हणजे माझ्या मित्राच्या आणि तुझ्या मैत्रिणीच्या भावाच्या, लग्नात आपली पहिली गाठ पडली! '' संजयचा स्वर एकदम बदलला.

''आठवतेय तुला आपली पहिली भेट ?'' रटाळ आवाजात आतापर्यंत कंटाळवाणं बोलणाऱ्या संजयच्या आवाजात कसलातरी जादूई बदल झाला. पल्लवीच्या अंगावर झर्ररकन् काटा फुलला. दोघांचीही नजर एकमेकांना भिडली. डोळ्यात डोळे हरवले. मधला सगळा काळ, सगळा अवकाश नष्ट होऊन भूतकाळातला तो पहिल्या प्रेमाचा पहिला क्षण रसरशीतपणे जिवंत झाला. पण दुसऱ्याच क्षणी ऑस्ट्रेलियातल्या सुन्नपणाचं झाकोळ तिच्या मनात दाटून झालं. स्वतःला सावरून तिनं त्याच्या नजरेतली नजर काढून भिंतीवरच्या हेब्बरच्या घोड्यावर लावली.

ब्लू डायमंडच्या लाऊंज मधल्या कोपऱ्यात मुलाखत चाललेली होती त्यांची.

''मला जुनं काहीही आठवत नाही.'' ती रूक्ष स्वरात म्हणाली.

त्यानं एक उसासा सोडला.

''मनीषा !'' तो म्हणाला,

''मनीषाशी लग्न केलं नसतं तर मला तुरुंगात अडकवण्याची योजना तिच्या बापानं केली होती!''

''हं.''

''लग्नानंतर सुद्धा मनीषा माझ्याशी कधीच नीट वागली नाही. तिचा क्लब, तिच्या मैत्रिणी, तिचे मित्र यातच ती गुंग असायची. तिचे वडील वारले आणि तिला प्रेग्नन्सीमध्ये कॅन्सर झाला तेव्हापासून ती खूप बदलली.''

बराच वेळ संजय बोलत राहिला. खाण्या पिण्याकडे दोघांचं ही फारसं लक्ष नव्हतं. वेटर्स अधून मधून येऊन काही डिशेस घेऊन जात होते आणि काही नवीन डिशेस ठेवून जात होते, एवढंच !

''मी मनीषाला घटस्फोट देतो, '' संजय म्हणाला,

''आणि आपण पुन्हा लग्न करू !''

पल्लवीनं दचकून पुन्हा वर पाहिलं. थेट त्याच्या डोळ्यात. तिच्या हातातला चमचा टेबलावर आणि काटा डिशवर मोठा खणखणाट करून गळून पडला.

''आई तर काय खूप बिचारी आहे. सारखी आजारी आजारीच असते!''

पल्लवीच्या मनात चारुताचे मनीषाविषयीचे शब्द घुमायला लागले.

तिच्या डोळ्या तिरस्कार उमटलेला संजयला स्पष्ट दिसला. तो आक्रोश केल्यासारखा म्हणाला,

''पल्लवी, मी खरंच सांगतोय. मनीषाची सुद्धा याला तयारी आहे.''

पल्लवीचे डोळे विस्फारले.

''म्हणजे? तू तिला हे सगळं सांगितलंयस्?''

''हो. खरं तर ती कॅन्सरमधून बरी झाली, आणि तेव्हाच तिचे वडील वारले. तेव्हापासून ती मला बरेचदा तुम्ही मला सोडून द्या, दुसरं लग्न करा असं म्हणायची. पण मी कधी तसं केलं नाही. मला माझ्या दैवाचे फासे कसे पडतात याची सतत भीतीच वाटत रहायची. तुझा शापच मला भोवतोय असं माझ्या मनानं घेतलं होतं तेव्हा.''

पल्लवी सुन्नपणे ऐकत राहिली. लहानशी चारुता मनीषाची काळजी घेतेय, तिला रागावून जबरदस्तीनं व्यायाम करायला लावतेय असं चित्र तिला डोळ्यापुढे दिसायला लागलं. अगदी वाईटात वाईट माणसांमध्ये देखील चांगुलपण असतो का? पण तिचं मन एकाकएकी सावध झालं! पुन्हा विषाची परीक्षा कोण घेणार? हा समोर बसलेला प्रियकर संजय नवरा संजय झाल्यावर तसाच राहील? की काही दिवसांची नवलाई संपल्यावर पुन्हा राक्षस बनेल? तिला गच्चीवर रडणाऱ्या चारुताचा आवाज ऐकू यायला लागला. तिच्या डोळ्यांपुढे अंधारी यायला लागली. मालती बाईंनी मारल्यानंतरचा असहाय पणा तिला जाणवला. हॅरी पॉटरमध्ये वाचलेले डिमेंटर्स तिच्यावर झेपा घ्यायला लागले. ऑस्ट्रेलियातला सुन्नपणा परत मन झाकोळून टाकतो की काय अशी स्थिती झाली. तिनं भिंतीवरच्या पिकासोच्या पेंटींगच्या कॉपीवर लक्ष केंद्रीत केलं. डोळे झाकून काही क्षण दीर्घ, हळूहळू श्वासोच्छश्वास केला. ती पुन्हा पूर्ववत झाली.

संजय काहीतरी बोलत होता. ती उठून उभी राहीली.

''ठीकै. मी निघते.'' ती म्हणाली.

''पण मला अजून खूप बोलायचंय. तू काही सांगितलंच नाहीस.''

तिनं त्याच्या केविलवाण्या, मठ्ठ चेहऱ्याकडे पाहिलं. दैव! दैवात असेल ते होतंच! झाल्याशिवाय रहात नाही म्हणे! केवढं पाल्हाळ लावलं होतं त्यानं सुरूवातीला. जे काही घडलं त्याला ''दैव'' असं नाव देऊन दुबळे लोक स्वतःचं समाधान करून घेतात! पल्लवीला एकाएकी संगीताचं वाक्य आठवलं! काय खरं? काय खोटं? आणि मोह? मोह तर जबरदस्त होता! जणू दैव

हार मानून तिच्या समोर हात जोडून उभं होतं. दहावीतली तरुण, गोऽड चारुता! सतत तिच्याबरोबर राहणार! तिला आई म्हणणार! हा समोर दिसणार संजय तर काय आधीच्या संजयंच टरफल असल्या सारखा होता. तिला चारुता मिळाली असती. उरलेलं सगळं आयुष्य चारुताची आई म्हणून काढता आलं असतं! चारुताचं शिक्षण, तिचं लग्न, तिची मुलं! त्यांची ती आजी! संजय म्हणत होता.

''सांग नं! तू काही सांगितलं नाहीस!''

''मी निघते आता,'' ती पुन्ही रुक्षपणे म्हणाली.

''मी नंतर कळवीन. पण तू चारुताला काहीही बोलू नकोस. या वयात मुलं फार सेन्सिटिव्ह असतात.''

आणि मग चटकन वळून ती ताड ताड चालत निघालीच. कधी त्याच्या नजरेच्या टप्प्यातून बाहेर होतोय असं तिला झालं. तुझा शाप मला भोवला असं वाटत राहिलं. संजय म्हणत होता आणि तिनं संजयला होकार दिला तर मनीषाचा शाप तिला लागणार नाही? चारुताला लागणार नाही? ती घाबरली. रिक्षा घेण्याचं सुद्धा तिला सुचत नव्हतं. चारुता–मनिषा एकत्र! केवढं सुंदर चित्रं होतं ते ! त्यावर एक काळ्या रंगाचा सपकारा आपण मारायचा! पण आपण... चारुताची आई. सतत तिच्याबरोबर रहायचं. पण लग्नानंतर संजयच्या देखील काही अपेक्षा असणारच! तिचं शरीर बंड करून उठलं आणि तिच्या मनाला किळस आली. फुटपाथ वरच्या गर्दीला टाळत ती प्रतिक्षिप्त क्रियेच्या सराईत पणानं वेगानं वाट काढत होती. तिचं मन वावटळीत सापडल्यासारखं झालं होतं. तिच्या अवती भोवती रात्रीचं शहर पेटलं होतं. तिच्या सगळ्या इच्छा फूत्कार टाकल्यासारख्या तिच्या अवती भोवती घोंगावत होत्या. एका म्हाताऱ्या भिकारणीनं हात लावून तिला आपला तुटलेला दुसरा हात दाखवून भीक मागितली तेव्हीं ती जोरात ओरडणारच होती!

दिवा लाल झाला आणि तिचे विचार थांबल्यासारखे झाले. तिच्या शेजारीच लांबलचक कार ब्रेक दाबून थांबली. बंद कांचामधून दबक्या आवाजातलं. ''धब धब'' रॉक म्युझिक ऐकू येत होतं. ती थांबली. तिला थकून गेल्यासारखं झालं. आपल्या आयुष्याचा अर्थच तिला कळेनासा झाला. तिनं पाहिलं तर तिला एका दुकानाचं बंद शटर दिसलं. पायातली शक्तीच हरवल्या सारखी ती त्या दुकानाच्या पायऱ्यांवर मटकन बसली आणि ताणलेल्या डोळ्यांनी तशीच बसून राहिली. तिच्या भोवती शहर, त्या भोवती देश, त्या भोवती पृथ्वी विस्तारतांना तिला जाणवत होती. पृथ्वी भोवती गिरक्या घेणारे सॅटेलाईटस्. त्यांनी जोडली गेलेली शहरं. फेसबुक. पल्लवी, चारुता–– मनीषा, संजय –– आणि एकमेकांच्या इच्छांना जोडलेली ती असंख्य माणसं. ते महाजाल. सॅटेलाईटस् नी एकत्र जोडलेल्या कॉम्प्युटर्स सारखा इच्छांनी, वासनांनी, भावनांनी, वात्सल्यानी, तिरस्कारानी एकमेकांशी जोडला गेलेला माणसांचा तो प्रचंड समूह! ते महाजाल

जाणवताच ती हताश झाली! आपण काय निर्णय घ्यावा तिला कळेनासं झालं. ती त्या विश्वाच्या महाजालातली एक बिंदू बनून राहिली.

आणि ते शहर आपलं जादूई रंगीत इंद्रजाल तिच्याभोवती विणतच राहिलं!

***

# निर्वासित

'कल्व्हर्ट टाउन' मधल्या 'हेलेना रो' वसाहतीतल्या 'टी–३४–बॉनव्हिल' या बैठ्या घरासमोर आपली इलेक्ट्रिक बाईक पार्क करून यू.एस.पोस्टस्च्या कार्ल बेनेटनं बेलचं बटण दाबलं.

रमेश कांबळे नं दार उघडलं.

''काल देखील मी येऊन गेलो.'' कार्ल म्हणाला.

''हो,'' रमेश म्हणाला, ''तुम्ही दाराला लावलेल्या नोटनुसारच आज मुद्दाम घरी राहिलोय्!''

सही करून त्यानं पत्र घेतलं. जरा चुरगळलेलं पाकीट. त्याची बायको सुप्रिया नेने बोटाभोवती चावी फिरवत जिन्यानं खाली आली. आज तिची ड्यूटी होती रात्री आठ ते पहाटे चार – ग्रेव्हयार्ड शिफ्ट– स्मशानपाळी. रमेशनं जुना चाळा म्हणून शब्दाचं मराठीत भाषांतर केलं. हो! कोणे एके काळी तो लेखक होता म्हणे!–

''कसलं पत्रं आलंय्?'' सुप्रिया म्हणाली.

''घरून आलेलं दिसतंय!''

बाहेर बर्फ पडत होतं.

''आज अगदी जायला जिवावर आलै बॉ! ग्रेव्हयार्ड शिफ्ट!''

''नको जाउस, दांडी मार!''

''हो! तुझं बरंय! टॉप कॅडर मधला आहेस. नो शिफ्ट ड्यूटी! ... ओके! उशीर होतोय! मी निघते.''

जीन्स–टी शर्ट घातलेली सुप्रिया नेने–रमेश कांबळेची बायको लॅचचं दार लावून बाहेर पडली. टी–शर्टवर लेटेस्ट फॅशनची आफ्रिकन मण्यांची माळ. नो मंगळसूत्र! ओःऽऽ कमॉन! धीस वॉज कॅलिफोर्निया! दारावरची पाटी थरथरली. पाटीवर दोघांचीही नावंः वर सुप्रिया नेने– खाली रमेश कांबळे – नो मिस्टर – नो मिसेस – दोघे एकाच आय.टी. कंपनीत काम करताना एकत्र आले, आपल्या आई वडिलांनी बघितलेल्या टिपिकल मुलांना कंटाळलेली सुप्रिया रमेशच्या प्रेमात पडली अन दोघांनी झटक्यात लग्न सुद्धा करून टाकलं! पुढे हनीमून वगैरे झाल्यावर सावकाश सगळ्यांना कळवलं.

रमेशनं पत्र उघडलं. एक पानीच होतं. सुरुवात थोडी वाचली आणि शेवट पाहिला – कळावे, आपला, बाविस्कर गुरुजी. त्याला आश्चर्य वाटलं. मग तो पहिल्यापासून पत्र वाचायला

लागला आणि वाचता वाचता त्याचे डोळे विस्फारले. त्याच्या पोटात एक थंड गोळा तयार झाल्यासारखी. त्याची आतडी आक्रसली.

''....कांबळे गुरुजी म्हणून लोकप्रिय झाले होते. थेपडे यांनी नगरपालिकेत चालवलेला भ्रष्टाचार त्यांनी उघड केला. थेपडेंच्या विरुद्ध ते निवडणुकीसाठी उभे होते. त्यांच्या झाकण नसलेल्या मॅनहोलमध्ये पडून झालेल्या मृत्यूविषयी सर्वांना शंकाच वाटत असली तरी या लहानशा पारोळा गावात थेपडेविरुद्ध बोलण्याची कुणाची हिंमत नाही. पोलिसांनी उलट आपले वडील कै. जगन्नाथ कांबळे यांच्या विरुद्ध मॅनहोल झाकण चोरी करण्याचा गुन्हा दाखल केला आहे. आपण स्वतः येऊन सर्व व्यवस्था लावावी. त्यांचा इतर कुणी नातेवाईक नाही. कळावे. आपला– बाविस्कर गुरुजी...''

थेपडे वकील, राजाराम बापू–पाटील, मामा, सगळी पारोळ्याच्या गुंडांची टोळीच रमेशच्या डोळ्यांसमोर उभी राहिली. त्यानं पत्रावरची तारीख पाहिली. म्हणजे आज आठवा दिवस होता. उद्या जाणं शक्यच नव्हतं. परवा निघता येईल, पण सांगता नाही येत. जायला २४ तासांपेक्षा थोडा जास्तच विमान प्रवास! पण तरी जायला पाहिजेच!

***

पारोळ्याला फक्त दोन हॉटेलं. एक पण एसी नाही. त्यामुळे रमेश जळगावला एक दिवस राहिला. भाड्याची कार घेऊन पारोळ्याला आला. बाविस्कर गुरुजी स्टँडच्या कोपऱ्यावर थांबलेले होते. लहानपणी रमेश पण त्यांच्या हाताखाली शिकलेला होता. त्यांना कारमध्ये घेतल्यावर ड्रायव्हरनं त्यांनी सांगितली तशी कळवून कार पोलिस स्टेशनपाशी आणली. पोलिस इन्स्पेक्टर खंडागळेनं एक लाल कापडानं तोंड बांधलेला तांब्याचा कलश टेबलावर आणून ठेवला.

''किती दिवस वाट पाहाणार? आम्ही अग्नी देऊन टाकला मग.'' खंडागळे खरखरीत आवाजात म्हणाला.

''त्यांच्या कसल्या केसेस आहेत?''

''मॅनहोल चोरून विकायची गँग होती त्यांची.'' खंडागळे पुन्हा खरखरला.

''मला बाविस्कर गुरुजींनी सांगितलं सगळं खरं काय ते. तुम्ही त्या केसेस काढून टाका. त्यांच्याविरुद्धच्या आणि त्यांच्या एन.जी.ओ. विरुद्धच्या.''

''नाही साहेब, ते शक्य नाही.''

''असं कसं शक्य नाही? अशा खोट्या केसेस तुम्ही कशा करू शकता?''

''खोट्या केसेस नव्हत, साहेब, तुम्ही बघा घरी जाऊन!''

''ते देखील माहितीय. प्लीज तुम्ही असं मृत व्यक्तीची खोटी बदनामी करायचं काम करू नका.''

''केस खोटी नाही. केस खरीच आहे!''

बराच वाद घालून, पैसे ऑफर करून पण काही फायदा झाला नाही. उलट खंडागळे जेव्हा धमकावणीच्या स्वरात म्हणाला –

''साहेब, तुम्हाला अमेरिकेत परत जाणं कठीण होईल बरं का! मी तुमचा पासपोर्ट जप्त करू शकतो,'' तेव्हा रमेश आपल्या वडिलांच्या अस्थींचा कलश घेऊन मुकाट्यानं निघाला.

''याऽऽ ! धिस वॉज इंडिया मॅऽऽन! इथे काहीही होऊ शकतं!'' स्वतःच्या षंढत्वावर चरफडत रमेश बाविस्कर गुरुजींची स्टोरी ऐकत होता. सत्याचा पराजय आणि असत्याचा विजय सांगणारी स्टोरी ! गेल्या दोन वर्षांत करोडो रुपयांचा घोटाळा थेपडे, राजाराम बापू आणि कंपनीनं पारोळा आणि त्याचं वर्चस्व असलेल्या जळगाव जिल्ह्यातल्या नगरपालिकांमध्ये केला होता. मॅनहोलची लोखंडी झाकणं बनवणारी एक बोगस कंपनी स्थापन करून दोन वर्षांपासून शेकडो मॅनहोलची झाकणं सप्लाय केल्याचं दाखवून करोडो रुपये लुटले होते. त्यासाठी जवळजवळ दर आठवड्याला मॅनहोल कव्हर्स चोरी झाल्याच्या तक्रारी दोन वर्षापासून सगळ्या गावांमध्ये नियमित पोलिस स्टेशनला रजिस्टर करण्यात येत होत्या आणि आता तर या मॅनहोल चोरांची एक गँग असून जगन्नाथ कांबळे हे त्या गँगचे मुख्य होते, त्यांची एन.जी.ओ. 'निरपेक्ष' ही ती गँग चालवण्यासाठी एक 'कव्हर' आहे, असा दावा पोलिसांकडून कागदोपत्री केला जात होता. याचं कारण म्हणजे जगन्नाथ कांबळेनं थेपडेचं हे रॅकेट उघड करायला सुरुवात केली होती. अगदी टी.व्ही. चॅनेल्सवर पण दाखवलं गेलं होतं दोन–तीन एपिसोड मधे की एकूण १७ नगरपालिका मिळून गेल्या दोन वर्षात १५ ते १८ करोड रुपयांचा घोटाळा नगराध्यक्ष थेपडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी केला असावा– म्हणून! पण मग एकाएकी त्या चॅनेल्सवरचा तो प्रचार बंद पडला होता. आणि जनता ते विसरून गेली होती.

रमेशनं भारत सोडून अमेरिकेत रहायचा निर्णय घेतला त्यावेळची परिस्थिती त्याला आठवली. बाबांनी नाराजी, आई तर त्याच्या लहानपणीच वारलेली. भारतात दीड वर्ष केलेल्या नोकरीचा क्लेषदायी अनुभव, अन त्या विरुद्ध अमेरिकेत मिळालेल्या पहिल्या नोकरीच्या सुखद अनुभव. त्यातच त्याच्या चुलतभावाचा झालेला खून! त्याच्या चुलतभावाच्या खुन्यांना शिक्षा तर झाली नाहीच वर ते उजळ माथ्यानं गावात फिरत राहिले हे पाहून वेडे झालेले त्याचे काका. त्याला भारतात राहायला भीतीच वाटायची. अन् अमेरिकेतल्या नोकरीत सुप्रिया भेटल्यावर तर सगळं आयुष्य रेखील आखल्यासारखंच होतं, बरं, काहीतरी न्यायाची आशा असेल तर ठीक आहे, पण अन्याय अन् अत्याचारच होण्याची खात्री असताना, दोन्ही हात वर करून, ''या हो! करा माझ्यावर अत्याचार!'' म्हणून त्यांच्या मनोरंजनासाठी आपला, आपल्या शरीराचा उगीच बळी द्यायचा?

त्यापेक्षा अमेरिकेत परत गेल्यानंतर तिथल्या 'ह्यूमन राईट्स ग्रूप' तर्फे नक्कीच जास्त इफेक्टिव्हली...

बाविस्कर गुरुजींनी ड्रायव्हरला गाडी थांबवायला सांगितली. रमेशला बातमी कळल्यापासून रडू आलेलं नव्हतं. आता आपल्या लहानपणापासूनच्या, जन्मापासूनच्या राहात्या घरासमोर उभं राहून तिकडे पाहाताना रमेशला अचानक असह्य उमाळा फुटला. त्याला गदगदून रडूच यायला लगालं. बाविस्कर गुरुजी त्याच्या पाठीवरून हात फिरवत राहिले. केवळ सवयीनं त्यांनी झब्ब्याच्या खिशात हात घातला तर चक्क दोन-तीन चॉकलेट होती- स्वस्तातली. कडक-टणक रावळगाव. शहरात न मिळणारी. सवयीनंच त्यांनी एक दोन काढून रमेशच्या हातावर ठेवली. ''चघळत रहा. बरं वाटेल.'' ते म्हणाले. रमेशनं आवरण काढून गोळी तोंडात टाकली आणि अनेक वर्षांपूर्वी जी चव लागली तीच चव पुन्हा लागताच मधली वर्ष जणू गळून पडली. रमेश पुन्ही पाचवीतला रमेश झाला. त्याचे हुंदके थांबले. तो रावळगावची बॉइल्ड शुगर टॉफी चघळत राहिला.

रमेशला त्याच्याच घरात प्रवेश नव्हता. लालभडक अक्षरात 'निरपेक्ष' ची पाटी घरावर होती. अंगणात मॅनहोलच्या झाकणांचे ढीग लावलेले होते. निदान पन्नास-साठ तरी मॅनहोल कव्हर्स असावेत. फटकापाशी पहाऱ्याला एक पोलिस उभा होता.

''पोलिसांनीच त्यांच्या जीपमधून मॅनहोल कव्हर्स आणून अंगणात टाकलेत...'' बाविस्कर गुरुजी सांगत होते.

शेवटी कार गुरुजींच्या घरी. तिथे गुरुजींच्या बायकोनं-सगळं गाव त्यांना मोठ्या वहिनी म्हणायचं- -कसं ते नाव पडलं होतं कोण जाणे- त्याला गरम जेवण दिलं आणि ते चवदार जेवण जेवून तो सुखावला. आरामखुर्चीत पडल्या पडल्या पाच मिनिटं त्याचा डोळा लागतो न लागतो तोच बाजी कुसाळे म्हणून 'निरपेक्ष'चा कार्यकर्ता त्याला भेटायला आला. मग कारनं बाजी कुसाळेच्या घरी. तिथे बाविस्कर गुरुजी आणि बाजीच्या सांगण्यानुसार काही पॉवर ऑफ ॲटर्नी रमेशनं सही करून दिल्या. 'निरपेक्ष'चं ऑफिस असलेलं ते चार खोल्याचं बैठं घर - बाबांनी ते बांधायलाा अगदी जिवाचं रान केलेलं होतं - त्याच्यावरचा वारसा हक्क सोडून त्यानं ते पूर्णपणे 'निरपेक्ष'ला देऊन टाकलं. मग शेवटी गाडी जळगावला मोरोक्को हॉटेलात त्याला सोडून निघून गेली.

बाजीला भेटल्यावर रमेशला जरा आशा वाटली होती. तरुण, उत्साही होता. पोलिस 'निरपेक्ष'चं ऑफिस सील करायला आले तेव्हा एका मुख्य कॉंप्युटरचा सीपीयू त्यानं खिडकीतून मागे झाडीत ठेवला होता, आणि पोलिसाचं लक्ष नसताना रात्री घराच्या मागे जाऊन पळवून आणला होता. त्या सी.पी.यू. चा केसेसमध्ये-विशेषतः 'निरपेक्ष' या एन.जी.ओ. विरुद्ध पोलिसांनी दाखल केलेल्या केसेसमध्ये खूप उपयोग होणार होता.

रमेशनं कलश टीपॉयवर ठेवला आणि पलंगावर पसरत टीव्हीवर रिमोट दाबला – ‘आदर्शची इमारतच काय ती आता हरवायची राहिलीय्!’– वार्ताहरीण सांगत होती– ‘कुठलातरी नवीन स्कॅम–त्यातल्या फाईल्स, कागदपत्रं एकेक करून अदृश्य होत होते.’

‘अस्थी उद्या नाशिकला गोदावरीला विसर्जित करून परवा एकदाचं पुन्हा विमानात बसून परत निघावं.’–

–एवढ्यात एका सहकाऱ्याचा फोन आला. अपेक्षित होताच. वार्षिक स्वमूल्यांकन– ‘ॲन्युअल सेल्फ अप्राइजल’ सोडून तो आला होता. ते तो एक आठवडा उशीरा देणार होता. तर सहकाऱ्याचा ‘शक्य तितक्या लौकर ये, सद्या इकॉनॉमिक क्रायसीसमध्ये–मंदीमध्ये–धोका पत्करू नकोस’– असा फोन होता, अन् तो फोन संपल्यावर लगेच सुप्रियाचा फोन आला आणि रमेशला तिचा आवाज ऐकताच एकदम खूपच बरं वाटलं. तिनं शांतपणे सगळं ऐकून घेतलं आणि आपल्या प्रॅक्टिकल बोलण्यानं त्याचं सांत्वन केलं. ‘‘शांतपणे सगळं कर आणि फालतू लीगल किंवा टेक्निकल बाबतीत न अडकता पट्कन परत ये‘‘, म्हणून तिनं सांगितलं. सुप्रियाशी बोलणं झाल्यावर रमेशला स्वच्छ झाल्यासारखं वाटलं. भारतात परतल्यापासून पत्करलेलं एक प्रकारचं दबलेपण, धास्ती, आपली हिंमत मानवी क्रूरतेपुढे फार मर्यादित आहे अशी एक षंढत्वसदृश अपराधी जाणीव, अन्याय सहन करत असल्याचा अपराधीपणा–सगळं गळून पडलं आणि त्याला स्वतः विषयी पुन्हा एकदा पॉझिटिव्ह वाटायला लागलं. आणि मग चोवीस तास विमानाचा प्रवास आणि भारत–अमेरिकेतील वेळाच्या फरकामुळे जाणवणारा जेट लॅग त्याच्यावर चालून आला आणि तो झोपेत सखोल बुडून गेला.

***

रमेश कांबळे आपल्या वडिलांच्या अस्थी विसर्जित करून आला त्याला आता आठ वर्षे होऊन गेली होती. सध्या तो आणि त्याची बायको सुप्रिया दोघेही एका लहान आय.टी. कंपनीचे मालक होते. कल्व्हर्ट टाउन मधल्या श्रीमतं व वजनदार मंडळीत त्यांची गणना होऊ लागली होती. त्यांना एक मुलगा, एक मुलगी – अशी मुलं होती. दोघेही हुशार. शाळेत आणि आपल्या मित्रांमध्ये लोकप्रिय होती. कल्व्हर्ट टाउन मधल्या भारतीयांनी एक ‘इंडिया सेंटर’ स्थापन केलं होतं, तिथे दुसऱ्या दिवशी म्हणजे पंधरा ऑगस्टला स्वातंत्र्य दिन साजरा व्हायचा होता. – स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमाचं निमंत्रण रमेशनं बाजूला ठेवलं. ‘आज चौदा ऑगस्टची संध्याकाळ’– त्यानं विचार केला आणि पत्रांच्या गठ्ठयातलं पुढचं पत्र उचललं. भारतातून आलेलं. पाकिटावर फ्रॉम–बाजी कुसाळे !

रमेशनं फोडून पत्र वाचलं. सर्व केसेस मध्ये आपण हरलो, 'निरपेक्ष' ची इमारत, तो प्लॉट सगळं विकून नगरपालिकेनं चोरीला गेलेल्या मॅनहोल्सची भरपाई केली. बाजीनं शेवटी क्षमा मागितली होती–

''तुमच्या वडिलांवर लावलेला खोटा कलंक मी मिटवू शकलो नाही, त्याबद्दल क्षमस्व!''

रमेश कांबळेनं एक उसासा सोडून पुढचं पत्र उचललं.

***

पंधरा ऑगस्ट. 'कल्व्हर्ट टाउन' मधल्या 'इंडिया सेंटर'वर सगळे अनिवासी भारतीय एकत्र जमलेले. सकाळची वेळ. खरं तर बऱ्याच जणांना दृष्टीनं ही भली पहाटच होती ! पण सगळी तयारी अगदी जय्यत होती. प्रमुख पाहुणा म्हणून कल्व्हर्ट टाउनचा मेयर बॉब मॅक कॉर्मिकला बोलावलं होतं. त्यानं दोरी ओढताच झेंडा झर्रर्रकन वर गेला आणि बिनाधुराचे चायनीय क्रॅकर्स फुटून सगळ्यांच्या अंगावर रंगीबेरंगी ताऱ्यांचा वर्षाव झाला. लहानपणापासूनच्या सवयीनुसार हातापायांचे स्नायू ताणून रमेश अटेंशन मध्ये तिरंग्याकडे पाहात होता. पण त्याच्या डोळ्यांसमोर त्याचं अंगण दिसत होतं. अंगणात मॅनहोल कव्हर्सचे ढीग पडलेले. गेटपाशी पोलिस पहाऱ्यासाठी उभा, आणि त्याला मात्र त्याच्या स्वतःच्या हक्काच्या राहत्या घरात प्रवेश नव्हता !

# परीसस्पर्श

हिंदी चित्रपटसृष्टी. त्याचा बक्षीस समारंभ म्हणजे अ‍ॅवॉर्ड फंक्शन. हाँगकाँगमधे सुरू असलेला. सूत्रसंचालक हिंदी-इंग्रजीच्या मिश्रणातून बोलतायत. वाजिद खान आणि मोनिषा. आधी टेक्निकल अ‍ॅवॉर्ड्स - तांत्रिक बक्षिसं- देऊन झालीत. कार्यक्रम दोन तृतीयांश संपलेला. आता मुख्य बक्षीसं सुरू होतायत.

''और...बेस्ट म्युझिकल स्कोर ऑफ द इयर के लिये नॉमिनीज है...

अजय-विजय फिल्म -कारवाँ हमारा

शिवशरण फिल्म -क्रेझी थ्री

अजय-विजय फिल्म -मुहब्बत

सईद उस्मान फिल्म -इनायत

सुदेश करकरे फिल्म -सपनों के शहर

और ये अ‍ॅवॉर्ड अनाउन्स करने के लिये मैं स्टेज पर बुलाना चाहूंगा श्री. यश चोप्राजी और प्रियंका को... यशजी और प्रियंकाजी प्लीज!''

यश चोप्राच्या दंडाला धरून प्रियंका स्टेजवर येते. यश चोप्रा पाकिट उघडतो, प्रियंका त्याच्या आणखी जवळ जाऊन नाव वाचते.

यश चोप्रा म्हणतो, ''अँड द अ‍ॅवॉर्ड गोज टू...''

प्रियंका म्हणते, ''सुदेश करकरे फॉर फिल्म 'सपनों के शहर' ''

पार्श्वसंगीत म्हणून 'सपनों के शहर' चं गाणं वाजत राहतं.

चल कहीं और चल
सपनों के शहर से
यहाँ बीते जो पल
लगते है जहर से...

सुदेश करकरे स्टेजवर येतो. त्याचं पहिलं बक्षीस. आठ वर्षं हिंदी फिल्म्सना संगीत दिल्यानंतर. आणि ते 'सपनो के शहर'ला! या रॉक, पॉप धूमधडाका किंवा सूफी संगीताच्या हिट होण्याच्या काळात साध्या, बाळबोध पण अतिशय सुरेल आणि गेय संगीत असलेल्या 'सपनों के शहर' ला! त्याच वर्षी सुदेशच्या आणखी आठ फिल्म्स आलेल्या. सगळ्यांचं म्युझिक हिट! आजच्या टॉपच्या संगीतकारांपैकी तर तो होताच. पण फिल्मफेअर अ‍ॅवॉर्ड पहिल्यांदाच.

''...... अँड लास्ट बट नॉट द लीस्ट, मेरी बीवी सरिता!! धिस इज फॉर यू - सरिता!''

कॅमेरा सरितावर. ती डोळे पुसतेय. स्टाइलिशपणे. आपल्या लांब पापण्या आणखी नीट दिसतील क्लोजअपमधे अशा प्रकारे.

***

सरिता जागी झाली तर सुदेश तिच्या शेजारी नव्हता. ती हॉलमध्ये गेली तर सोफ्या शेजारच्या टेबलावरचा छोटा लँप लावून बसलेला होता. समोर फिल्मफेअर ॲवॉर्डची ती पुतळी आणि हातात एक सीडी. साधी ब्लँक सीडी असते तशी. ती त्याच्या शेजारी जाऊन बसली. त्याच्या हातून सीडी घेऊन तिनं पाहिली. सीडीवर एक स्टिकर चिकटवलेला त्यावर स्केचपेननं लिहिलेलं– २३१४ – तेवीस चौदा.

''काय झालं, सुदेश? कसली सीडी आहे? झोप येत नाहीय का तुला?'' तिनं काळजीनं विचारलं. त्यानं एक सुस्कारा सोडला. फिल्मफेअर ॲवॉर्डची पुतळी उचलली. पुन्हा खाली ठेवली. तिच्याकडून सीडी घेतली. पुन्हा एक सुस्कारा सोडला.

''काही नाही. ॲवॉर्ड मिळाल्यामुळे एक्साइटमेंट आहे नं! त्यामुळे झोप येत नाहीय. तू जा. झोप मी स्टुडिओत तासभर घालवून येतोच झोपायला!''

''नक्की नं? डिप्रेशन वगैरे नाही नं मागच्या वेळासारखं?''

''नाही मुळीच नाही. डोंट वरी!''

''ओके. बाय – गुडनाईट!''

''गुड नाईट.''

सुदेश उठून आपल्या स्टुडिओत गेला. सीडी त्यानं प्लेअरमध्ये घातली. हेडफोन कानावर लावले आणि तो तल्लीन होऊन ऐकत बसला. मग त्यानं रिमोटनं सीडी बंद केली. सीडी बाहेर काढली आणि ती आपल्या कपाटाच्या अगदी आतल्या कप्प्यात ठेवून तो पुन्हा झोपायला गेला.

***

दुसऱ्या दिवशी सकाळपासून अचानक सगळं रूटीन बदललं. चॅनेल आणि पेपरवाल्यांची गर्दी तर झालीच, पण संध्याकाळपर्यंत नवकेतन आणि सर्वश्री प्रॉडक्शन्सच्या नवीन पिक्चर्सची काँट्रॅक्ट्स साईन झाली. नवकेतन आणि सर्वश्री दोन अतिशय मातब्बर हाऊसेस. दोन्हींचे संगीतकार वर्षानुवर्ष ठरलेले होते. त्यांनी बदल करून सुदेशला निमंत्रण देणं म्हणजे काहीतरी खासच होतं. पण सुदैवानं दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत बातमी फुटली नाही, नाहीतर सुदेशला रात्री उशिरापर्यंत पत्रकारांचा सामना करत बसावं लागलं असतं आणि त्यानंतरदेखील जवळ जवळ दोन–तीन महिने 'सपनों के शहर' हा चित्रपट आणि त्यातलं संगीत या ना त्या कारणानं गाजत राहिलं. नवकेतनचा नेहमीचा संगीतकार 'राही' दिलदार निघाला. त्यानं सुदेशला फोन करून त्याचं अभिनंदन केलं. नवकेतनच्या चार फिल्म्समधे लागोपाठ 'राही'चं संगीत फ्लॉप झालं होतं. राहीचं वयदेखील आता सत्तरच्या पुढे होतं. पण तरुणपणापासूनच तो एक उमदा माणूस म्हणून चित्रसृष्टीत प्रसिद्ध होता.

''शुक्रिया, राहीजी, शुक्रिया.''

''आप का संगीत मुझे पसंद है, और 'चल कहीं और चल' में तो वह एक... क्या कहूँ मैं... बताना मुश्किल है... जिसे एक 'डिव्हाइन टच' कहतें हैं... एक स्वर्गीय, ईश्वरीय स्पर्श इस धुन मे आया है!''

''बहुत बहुत धन्यवाद!''

सुदेशनं फोन ठेवला. स्वर्गीय स्पर्श. त्याच्या डोळ्यासमोर ती सीडी दिसली. तेवीसचौदा. पण सर्वश्रीचा शिवशरण खेर गरळ ओकायला लागला. सुदेशविरुद्ध आणि सर्वश्रीविरुद्ध. पण सुदेशनं मनावर घेतलं नाही. त्याला स्वतःला शिवशरण खेरच्या अतिशय गुंतागुंतीच्या वाद्यरचना अतिशय आवडायच्या. विशेषतः प्रत्येक

गाण्यात खास एका वाद्याचा डॉमिनन्स, खास एका वाद्याचा प्रभाव असलेली संगीतरचना करण्याची त्याची शैली त्याला फार आवडायची. आपल्या सुरुवातीच्या काळात त्यानं त्या शैलीची थोडीफार नक्कलदेखील केली होती. आणि त्याचंच भांडवल करून, त्याचेच दाखले देऊन आता शिवशरण गरळ ओकायला लागला होता आणि त्याचे शब्द ऐकून, वाचून, त्याच्या मुलाखती वाचून सुदेशला आपलंच गाणं म्हणावंस वाटत होतं.

चल कहीं और चल
सपनों के शहर से ।
यहाँ बीते जो पल
लगते है जहर से !

मग 'आयफा' ॲवॉर्ड्स आणि 'राष्ट्रीय पुरस्कार' म्हणजे नॅशनल ॲवॉर्ड, ही आणखी दोन ॲवॉर्ड्सदेखील या गाण्याला मिळाली आणि 'ग्रॅमी'च्या परराष्ट्रीय विभागात भारतातर्फे हे गाणं नॉमिनेट होणार अशी जोरदार चर्चा सुरू झाली. पण मग खूपच राजकारण शिजलं आणि शेवटी शिवचरणचं गाणं ग्रॅमी ॲवॉर्ड्ससाठी पाठवण्यात आलं. आणि कितीही अलिप्त राहण्याचा सुदेशनं प्रयत्न केला तरी किंचित कडवट चव त्याच्या तोंडात राहिलीच.

***

दरम्यान सुदेशच्या खाजगी जीवनात एक वादळ झालं. त्याचा मुलगा श्रीधर डून स्कूलमधे शिकत होता. त्यानं तिथं होस्टेलमध्ये आत्महत्येचा प्रयत्न केला आणि सुदेशला सर्व सोडून देहरादूनला धावपळ करावी लागली. सरितानं सगळं समर्थपणे सांभाळलं. सुदेशला आपलं लहानपण आठवलं. त्यानं स्वतःदेखील असाच प्रयत्न केला होता. असाच अठराव्या वर्षी. तेव्हा त्याच्या वडिलांनी त्याला समजावून सांगितलं होतं. त्याला गीता शिकवली होती. गीतेचा अर्थ सांगितला होता, समजावला होता. प्राणायाम शिकवला होता. त्याचे वडील संस्कृतचे शिक्षक होते. मुंबईच्या एका लहानशा शाळेत. सुदेशनं डॉक्टर किंवा इंजिनिअर व्हावं असं त्याचं स्वप्न होतं. पण सुदेश काही नीट शिकला नाही. संगीत, गाणं यातच त्याला रस होता. आणि स्वतः त्याला गीतेचा अर्थ समजावून सांगणारे त्याचे वडील गीतेतल्या शिकवणीप्रमाणे वागले नव्हते. त्यांची स्वप्नं मातीशी मिळवली म्हणून शेवटपर्यंत त्यांच्या मनात सुदेशविषयी अढी होती. नंतर सुदेश यशस्वी झाला, त्यानं कुठल्याही इंजिनिअर-डॉक्टरपेक्षा खूप जास्त पैसा मिळवला, तरीही त्यांची नाराजी दूर झाली नाही. त्यांना सरिता आवडायची नाही. घरी ज्यांचा सतत राबता असायचा ती फिल्मी मंडळी आवडायची नाहीत आणि शेवटी तर ते हट्ट करून आपल्या लहान मुलाकडे, दिनेशकडे अहमदाबादला जाऊन राहिले अगदी शेवटपर्यंत.

हॉस्पिटलमध्ये चेहऱ्यावर ऑक्सिजन मास्क, हाताला सलाईनची नळी लावलेल्या, आपल्या मुलाला, श्रीधरला पलंगावर पडलेला पाहून सुदेश हबकला. सरिताच्या तर पायातली शक्तीच एकाएकी नाहीशी होऊन ती कोसळली. नर्सनं तिला आधार देऊन उभं केलं आणि कॉटशेजारी एका खुर्चीत बसवलं. मग दोन दिवसांत हळूहळू सगळं स्पष्ट झालं. श्रीधरला तिथे होस्टेलला राहणं मुळीच नको होतं. त्याला ती शाळाच नको होती. सुदेश दुसऱ्या दिवशीच्या फ्लाइटनं मुंबईला परत आला. त्याची महत्त्वाची म्युझिक रिलिजेस, रेकॉर्डिंग्ज, त्याला जास्त थांबणं शक्यच नव्हतं. पण सरिता थांबली. तिनं सगळं सांभाळलं आणि मग श्रीधरला घेऊन ती

मुंबईला परत आली. मग श्रीधरला मुंबईच्या एका 'ॲक्टिंग स्कूल' मध्ये टाकलं. एका प्रसिद्ध अभिनेत्यानं काढलेलं ॲक्टिंग स्कूल. कारण श्रीधरची तीच इच्छा होती, अभिनेता बनण्याची. लहानपणापासून त्यानं त्याच लोकांना पाहिलं होतं. त्यामुळे त्याची तशी इच्छा असणं साहजिकच होतं. सुदेशनं आत्महत्येचा प्रयत्न केला होता तेव्हा 'कशासाठी जगायचं?' या प्रश्नाचं उत्तर देताना त्याचे वडील म्हणाले होते.

''आपल्या मानवी जीवनाला कुठेतरी देवत्वाचा स्पर्श होईल या आशेसाठी जगायचं.''

ते म्हणाले होते,

''व्यक्ति म्हणून आपण जितके मोठे आहोत त्यापेक्षा जास्त मोठं कार्य आपल्याकडून होईल म्हणून जगायचं.''

आणि मग सरतेशेवटी ते म्हणाले,

''आपल्यापेक्षा दुबळे आहेत त्यांच्यासाठी जगायचं. मी तुझ्यापेक्षा दुबळा आहे रे सुदेश! तू माझ्यासाठी जिवंत राहा! मला सहन नाही व्हायचं तू सोडून गेलास तर!''

सुदेशनं देखील हेच आपल्या मुलाला सांगितलं.

त्यानंतरची सगळी वर्ष सुदेशच्या उत्कर्षांचीच गेली. त्याचं संगीत चांगलं सशस्वी ठरत गेलं. चित्रपटांच्या मंदीचा काळ मधे आला. पण दोन-तीन चित्रपट केवळ त्यातलं सुदेशचं संगीतच खूप लोकप्रिय झाल्यामुळे तरले. पण सुदेशच्या मनातला सल तसाच होता. त्या पहिल्या फिल्मफेअर बक्षीसानंतरच्या दोन वर्षांमध्ये त्याच्या एकाही चित्रपटाला बक्षिसं मिळाली नव्हती. व्यावसायिक यश भरपूर मिळालं. समीक्षकांनी त्याचं संगीत नावालजं. पण त्यानंतर त्याचा एक चित्रपट आला 'छाया' नावाचा. त्यातलं 'कौन हो तुम, कहाँ से आये' हे गाणं खूप गाजलं. सर्वांना पुन्हा 'सपनों के शहर' च्या संगीताची या गाण्यानं आठवण झाली आणि या चित्रपटातल्या संगीतासाठी सुदेशला धडाघड फिल्मफेअर, आयफा, नॅशनल, स्टारडस्ट आणि सहारा अशी पाच ॲवॉर्ड्स मिळाली आणि सुदेशच्या मनातली अस्वस्थता कमी व्हायच्या ऐवजी वाढतच गेली. 'फिल्मफेअर' ॲवॉर्ड मिळालं त्या रात्री झोपायला दोन वाजले. साडेतीनच्या सुमारास सरिता उठली तर सुदेश जागेवर नाही. आता पूर्वीच्या फ्लॅटऐवजी त्यांचा बंगला होता. तो बंगल्यातल्या बेसमेंटमधल्या आपल्या म्युझिक स्टुडिओमधे जाऊन बसला होता. सरितानं त्याला खोदून खोदून विचारलं – त्याच्या अस्वस्थतेचं कारण शोधण्याचा प्रयत्न केला. पण सुदेशनं सगळं हसण्यावारी नेलं. इतकं गंभीर काही नसल्याची तिची खात्री पटवून दिली.

त्यानंतरच्या वर्षातच मणिरत्नम् या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या दिग्दर्शकाचा स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासावर आधारित 'आझादी' हा चित्रपट आला आणि यातल्या सुदेशच्या संगीतानं आतापर्यंतचे सर्व विक्रम मोडीत काढले! अनेक सन्मान तर मिळालेच, अनेक बक्षिसं मिळालीच, पण 'पद्मश्री' त्याला या चित्रपटानं मिळवून दिली. नंतरची दोन वर्षं देखील त्याला लागोपाठ फिल्मफेअर ॲवॉर्ड्स मिळाली आणि मग आणखी एक मानाचं पान त्याच्यासाठी हात जोडून उभं होतं. लंडनच्या रॉयल फिल्महार्मोनिक ऑर्केस्ट्राच्या तीन कन्सर्ट त्यानं कंडक्ट केल्या आणि त्याचं संगीत ऐकून ब्रॉडवे वर एका पाच तासांच्या संगीतिकेत, ब्रॉडवेच्या म्युझिकल ऑपेरात संगीत देण्याची जबाबदारी त्याला मिळाली. ती देखील अगदी यशस्वी झाली. पण तरीही त्याची अस्वस्थता वाढतच राहिली. एकदा तो मुलाखतीत म्हणाला होता, ''माझा एक अदृश्य प्रतिस्पर्धी आहे. एक अज्ञात प्रतिस्पर्धी आहे. त्याच्याशी स्पर्धा करताना मी कधीच जिंकलो नाहीये. सतत हरलोय.''

आणखी एकदा तो म्हणाला होता, ''कधी कधी मला माझं सगळं संगीत निरर्थक वाटतं. कलावंताच्या कुठल्या कलाकृतीला अमरत्वाचा परीसस्पर्श होईल हे कलावंत स्वतःसुद्धा सांगू शकत नाही.''

आणि त्याच्या या दोन मुलाखती बघताना सरितानं विचार केला होता, ''खरंच, किती मनस्वी कलावंत आहे हा आपला नवरा! आणि किती रहस्यमय! आणि इतकी वर्षं बरोबर राहूनही आपल्याला हा मनुष्य पूर्ण कळलाय काय?''

सुदेश करकरे. एक मनुष्य. एक संगीतकार. त्याच्या संगीताचा चढता आलेख अजूनही वर चढतच होता. मुंबईतल्या या फिल्म जगतात, या मायानगरीत लोकांचं थिल्लर आणि चिल्लर मनोरंज करायला कला जगतातले अतिरथी महारथी इथे एकत्र येत होते आणि फक्त मनोरंजन नव्हे, तर कधी कधी भव्य अशा अमर कलाकृतीदेखील घडवत होते. सुदेशला कळत नव्हतं की त्याच्या रस्त्याचा शेवट आलाय की नवीन रस्ता सुरू होतोय ते! त्यामुळे तो अस्वस्थ झाला होता.

***

सरिता शॉपिंग करून परत आली आणि तिनं रामदीनला साहेब कुठे आहेत म्हणून विचारलं. श्रीधर आता मोठा होऊन दिल्लीला गेला होता. त्यानं आर्ट फिल्म्समध्ये चांगलं नाव कमावलं होतं आणि दिल्लीच्या नॅशनल स्कूल ऑफ ड्रामामधे तो 'मेथड ॲक्टिंग'चा लेक्चरर म्हणून नोकरी करत होता. त्यामुळे सुदेश, सरिता आणि इतर नोकर चाकरच काय ते बंगल्यावर असायचे. सुदेश खाली तळघरातल्या स्टुडिओत जाऊन बसलेला होता.

''कुणी आहेत साहेबांबरोबर?''

''नाही, बाईसाहेब,'' रामदीन जरा काळजीच्या स्वरात म्हणाला,

''साहेब एकटेच पीत बसलेत!''

सरिता दचकली. सुदेश कधी एकटा पीत नसे, पण जर का तो एकटा बसून प्यायला लागला तर मग त्याला भान राहत नसे आणि आता यावर्षी सुदेशच्या दोन फिल्म्स बेस्ट म्युझिकसाठी नॉमिनेट झालेल्या होत्या. दरवर्षी ॲवॉर्ड मिळाल्यावर काही दिवस सुदेश अस्वस्थ असायचा. जास्त चिडखोर बनायचा. सरिता तशीच जिना उतरून बेसमेंटमधे गेली. सुदेशनं आपल्याला मिळालेली सगळी मुख्य ॲवॉर्ड्स समोर मांडून ठेवली होती आणि त्यासमोर स्कॉच व्हिस्कीची एक बाटली आणि ग्लास.

''सुदेश!'' सरिता म्हणाली, ''काय चाललंय हे तुझं?''

''आज फोन येणार आहे.''

ॲवॉर्ड मिळालं तर आज ज्यूरीच्या पॅनेलमधून फोन येणार होता.

''हो, मग?''

''माझ्या दोन फिल्म्स आहेत– रंग बरसे आणि कल क्या होगा.''

''मग?'' आणि इतक्यात सरिताला सुदेशच्या हाती ती सीडी दिसली. त्यावर एक स्टिकर चिकटवलेलं, अन् त्या स्टिकरवर पेननं लिहिलेलं : २३१४

''सुदेश! मला वाटतं ही सीडी मी पूर्वी तुझ्याकडे पाहिलीय! सुदेश, हे काय रहस्य आहे? ॲवॉर्ड्सनंतर तू असा चिडखोर का होतोस?''

''सरिता'', सुदेश मऊपणानं म्हणाला, ''बस जरा, अशी समोर बस. मी तुला एक गोष्ट सांगतो,'' सरिता बसली.

''सरिता, तुला आठवतं, मला पहिलं फिल्मफेअर ॲवॉर्ड मिळालं ते?''

''हो. 'सपनो के शहर'ला.''

''त्याआधी आठ वर्षं मी संगीत देत होतो. माझं संगीत हिट होत होतं, पण मला ॲवॉर्ड मिळालं नव्हतं. 'सपनों के शहर' मला मिळायच्या सहा महिने आधीची गोष्ट असेल. संगीत टॅलन्ट शोधण्याच्या एका रिॲलिटी शोमध्ये मी जज्ज होतो. कॉंटेस्टंट नंबर २३१४ – स्पर्धक क्रमांक २३१४– जरा वेगळाच आवाज. पण किंचित ऑफ की? का मुद्दाम हा अनवट पट्टीतून गातोय? पण एनी वे! आम्ही त्याला रिजेक्ट केलं. नंतर तो माझ्याजवळ आला आणि म्हणाला, ''सर, मी चांगला गायक नसलो तरी चांगला कंपोजर आहे. मी कंपोज केलेल्या आठ चाली माझ्या मित्रानं बासरीवर वाजवलेल्या आहेत. त्या या सीडीवर आहेत. प्लीज तुम्ही त्या ऐकून पहा न!'' – तर मी त्या चाली ऐकल्या आणि मी मंत्रमुग्ध झालो. अतिशय सोप्या आणि सरळ वाटणाऱ्या आणि तरीही मनात घर करून बसणाऱ्या. मी त्या रिॲलिटी शोच्या संयोजकांना त्याला कळवायला सांगितलं. पण त्यांना त्याचा ठावठिकाणाच लागेना! त्यानं दिलेला पत्ता – तो झाशीहून आला होता– अस्तित्वातच नव्हता. त्याचा शोध घेण्याचा मी खूप प्रयत्न केला. इतर रिॲलिटी शोजमध्ये, झाशीला, मुंबईच्या स्ट्रगलर्समधे, अगदी माझ्या ओळखीच्या पोलीस अधिकाऱ्यांनादेखील मी त्या रिॲलिटी शोची त्याची व्हिडिओ क्लिप दाखवून त्याचे फोटो देऊन तपास करायला सांगितलं. पण तो जो अदृश्य झाला तो झालाच! मग माझ्या मनात एक द्वन्द्व सुरू झालं इतक्या चांगल्या चाली – या स्वतःच्या म्हणून वापरायच्या? स्वतःच्या नसून सुद्धा? पण नाहीतर मग या पूर्णपणे वाया घालवायच्या? सतत अज्ञात ठेवायच्या? या कलाकृती लोकांना कधीच द्यायच्या नाहीत? तेव्हा शेवटी माझ्यातल्या संगीतकाराला राहवलं नाही आणि मी त्यातली एक चाल वापरली. 'सपनों के शहर' साठी आणि मला माझं पहिलं फिल्मफेअर ॲवॉर्ड मिळालं. मग मी ही सीडी माझ्या कपाटाच्या अगदी आत दडवून ठेवली. पण त्याचा काय उपयोग होता? त्या आठही ट्यून्स माझ्या मेंदूत होत्याच! मग दोन वर्षं मी त्यातली कुठलीही चाल वापरली नाही. तर दोन वर्षं नो ॲवॉर्ड्स. मग माझा मोह प्रबळ झाला. या चाली लोकांपर्यंत पोहोवचायच्या म्हणून ती वापरायला लागलो आणि त्यातल्या सातही चालींना बक्षिसं मिळत गेली आणि दरवेळी बक्षीस मिळालं की माझा जळफळाट व्हायचा! कुठला को कॉंटेस्टंट २३१४ – आणि बनलाय माझा प्रतिस्पर्धी!''

''सुदेश,'' सरिता त्याला थांबवत म्हणाली, ''मला तर तू सांगतोयस त्यात वेगळाच अर्थ जाणवतोय. बाबा म्हणायचे नं, मानवी आयुष्याला दिव्यत्वाचा स्पर्श होणं हे जगायसाठी कारण आहे? तुला दामाजीपंतांची गोष्ट आठवते नं? त्यांनी धान्याची कोठाारं दुष्काळात उघडून दिली आणि पैसे मिळाल्याची सरकारी पावती घेऊन एका अज्ञात व्यक्तिच्या स्वरूपात विठ्ठल त्यांचा बचाव करायला आला? तसा तुझा हा कॉंटेस्टंट २३१४ दिसतो!''

सुदेश आश्चर्यानं तिच्याकडे पाहत राहिला. मग म्हणाला,

''तसं असणं जरा अकल्पनीय वाटतं. पण प्रश्न तो नाही, प्रश्न हा आहे की मी जसा म्युझिकल जिनिअस म्हणून नावाजला गेलोय तसा आहे की नाही?''

''अर्थातच, सुदेश,तू आहेस! 'सपनों के शहर'च्या आधी 'घर' आणि 'इजाजत' मधेच, 'सपनों के शहर' च्या दोन वर्ष आधीच अनेक समीक्षकांनी तुझी जिनिअस म्हणून भलावण केली होती! तो परीसस्पर्श तुझ्या संगीतात आहेच! तेवीसचौदा केवळ एक निमित्त!''

''नाही, सरिता, पूर्ण ऐकून घे. या वर्षी माझ्या दोन फिल्म नॉमिनेट झाल्यात. 'रंग बरसे' मधे मी त्या सीडीवरच्या चाली वापरल्या नाहीत. ते पूर्णपणे माझं संगीत आहे आणि 'कल क्या होगा' मधे मी त्या सीडीवरची आठवी आणि शेवटची ट्यून वापरलीय! आता 'कल क्या होगा' ला ॲवॉर्ड मिळालं तर तो जिंकला आणि 'रंग बरसे'ला ॲवॉर्ड मिळालं तर मी जिंकलो. तसं झालं तर मला एक नवा उत्साह येईल. माझा एक नवीन प्रवास तिथून सुरू होईल!'' सरिता शांत बसली. सुदेशनं ग्लास उचलला, पण न पिताच बाजूला ठेवून दिला. सुदेशची व्याकूळता तिलाही जाणवत होती. ती देखील कलावंत होती. तिच्या आवाजावर तर सुदेश पहिल्यांदा मोहित झाला होता. त्यानं सांगितलेलं हे गुपित तो इतकी वर्ष तिच्यापासून दडवून ठेवण्यात यशस्वी झाला? तिला आश्चर्य वाटलं.

''सुदेश,'' ती म्हणाली, ''आपण माणसाचं आयुष्य, कला तत्त्वज्ञान यावर रात्र रात्र बसून गप्पा मारल्यात. तू जितकं सोपं, काळं-पांढरं सगळं समजतोस तसं नाही. पण निदान तू स्वतःशी प्रामाणिक....''

सुदेशचा मोबाईल वाजायला लागला. उत्सुकतेनं फोन उचलून सुदेश म्हणाला,

''हॅलो?''

''हां, सुदेशजी ! कॉंग्रॅच्युलेशन! इस साल का बेस्ट म्युझिकल स्कोअर आपको मिला है!''

''हां, हां, लेकिन कौनसी फिल्म के लिये?''

''जी, रंग बरसे! कॉंग्रॅट्स अगेन! अब मलेशिया जाने की तय्यारी करो,फंक्शन के लिये!''

सुदेशच्या डोळ्यांतून घळाघळा अश्रू वाहायला लागले. सरिताला छातीशी धरत तो म्हणाला,

''सरिता ! मी जिंकलो! माझा प्रवास आता सुरू झालाय! माझा स्वतःचा प्रवास!''

***

# रेडिओ केऑस

''गोंधॉल?'' जॉननं विचारलं,

''व्हॉट डझीट मीन?''

नरेंद्रनं पुन्हा एकदा त्याला 'ळ' चा उच्चार शिकवण्याचा प्रयत्न केला.

''दॅट्स व्हॉट आय सेड. गोंधाल. बट व्हॉट्स द मीनिंग?''

नरेंद्र आणि जॉन अमेरिकेत एकत्र शिकायचे. दोघेही नुकतेच इंजिनिअरिंग ग्रॅज्युएट झालेले. नरेंद्र गडगंज श्रीमंत. त्यामुळे स्कॉलरशिप वगैरे न मिळवता आयव्ही लीगमधल्या स्टोनीब्रुक युनिव्हर्सिटीत स्वतःचे पैसे त्यांच्या प्रचंड फीसाठी खर्च करून शिकत होता. अर्थात् बेसिक जीआरई, टोफेल वगैरेत प्रवेश मिळण्याइतकं स्कोअर आणण्याएवढा हुशार होता तो होताच. तिथे चार वर्षात इंजिनिअर बनताना त्याची जॉनशी चांगली मैत्री झालेली आणि करण जोहरनं 'द ग्रेट इंडियन मॅरेज' परदेशात फेमस केल्यानं जेव्हा जॉनला कळलं की इकडे डिग्री मिळाली, आणि तिकडे लगेच त्याच्या वडिलांच्या हुकुमाचा खलिता आला की ''लग्न ठरवलंय तुझं, परत ये!'' तेव्हा ते 'ग्रेट इंडियन मॅरेज' पहायला जॉन त्याच्याबरोबर आला होता. तो स्वतःचे पैसे खर्च करून भारत पाहण्याचं 'टुरीझम' देखील उरकणार होता. पण वाईचे सरदार देशमुख, म्हणजे नरेंद्र देशमुखचे वडील, यांना जॉन आपल्या मुलाच्या लग्नाला मुलाबरोबर येणार आहे हे कळलं तेव्हा त्यांनी आणखी एका हुकुमाचा खलिता नरेंद्रला पाठवला, ''जॉनचा एक पैसा देखील खर्च होता कामा नये!''

त्यामुळे मग जॉनच्या सगळ्या भारत दर्शनाची आणि 'द ग्रेट इंडियन मॅरेज' अनुभवण्याची चक्क फुकटात सोय झाली! जॉनच्या अमेरिकन मानसिकतेला कुणा अनोळखी माणसासाठी कुणी इतके हजारो डॉलर सहज खर्च करून टाकतो, ही गोष्ट म्हणजे एक चमत्कारच वाटत होता.

''व्हाट डझ 'गोंधाल' मीन?'' जॉननं पुन्हा विचारलं.

''इट मीन्स केऑस!'' जरा विचार करून म्हणाला.

''वाऽऽव ! वंडाऽफुल!'' जॉन म्हणाला.

''लाइक दॅट रॉजर वॉटर्स आल्बम?''

''रेडिओ केऑस?''

नरेंद्र जॉनकडे आश्चर्यानं पहायला लागला. त्यानं कधी अंबाबाईच्या गोंधळाचा आणि रॉजर वॉटर्सच्या 'रेडिओ केऑस' मधल्या 'केऑस'चा संबंध जोडला नव्हता. तो जॉननं जोडताच त्याच्यात डोक्यात ते गाण घुमायला लागलं.

रेडिओ वेव्हज् ही हीअर्स रेडिओ वेव्हज्
ॲटमॉस्फीअर इज थिन अँड कोल्ड
यलो सन इज गेटिंग ओल्ड
अँड द ओझोन
ओव्हरफ्लोज विथ रेडिओ वेव्हज्!
ही हीअर्स
रेडिओ वेव्हज्
रेडिओ वेव्हज्.

त्यानं उंचाड्या, नाक थोड वाकडं असलेल्या जॉनकडे पाहिलं. हातात सोनीचा अगदी लेटेस्ट अन् महागडा हँडीकॅम घेऊन आल्यापासून सारखा शूटिंग करत होता. एखाद्या हिंदी पिक्चरमधल्यासारखं नरेंद्रचं लग्न होत होतं. आणि का नाही? नरेंद्र हा सरदार हंबीरराव देशमुखांचा एकुलता एक मुलगा. वाईचे सरदार हंबीरराव देशमुख आता पुण्यात सेटल झालेले होते. कोरेगाव पार्कात अगदी एका बाजूला असलेला प्रचंड बंगला. बंगल्याभोवती आपण पुण्यातच आहोत नं, याविषयी शंका याची असा तीन-चार एकर हिरवागार परिसर. आणि हा परिसर आता रोषणाईनं, सजावटीनं, पाहुण्यांचा वर्दळीनं, पाहुण्यांना इकडून तिकडे नेणाऱ्या सुबक इलेक्ट्रिक गोल्फ कार्सनी डिस्नेलँडसारखा वाटायला लागला होता. पण छे इथला थाट वेगळाच होता - आणि रंग! हे भारतीय स्पंदन पावणारे रंग व्हायब्रंट कलर्स! डिस्नेलँड कसलं फडतूस अन् मळकट वाटलं असतं त्यातल्या त्या पेस्टल शेड्स आणि अर्थ कलर्स मधे! त्या जांभळ्या हिरव्या लाल पिवळ्या रंगाच्या आतषबाजीकडे तृप्तपणे पाहून जॉननं मान हलवली. ट्रे घेऊन जाणाऱ्या एका वेटरला थांबवून जॉननं एक स्कॉचचा ग्लास घेतला.

''तू आता तुझ्या खोलीवर जाऊन थांब. तीन–चार तास झोप काढ !'' नरेंद्रनं जॉनला –अर्थातच इंग्रजीत सांगितलं.

''एकदा गोंधळ, म्हणजे केऑस सुरू झाला की रात्रभर चालणार. 'जागरण' म्हणतात त्याला. नाईट व्हिजील!''

''ओके'' जॉन म्हणाला.

''रात्री दहा वाजता मेन हॉलमध्ये ये. तिथे सुरू होईल गोंधळ!''

''ओके!''

जॉन आपल्या खोलीत गेला पलंगावर बसून त्यानं कॅमेरा बाजूला टाकला आणि स्कॉचचा एक घोट घेतला. सहज चाळा म्हणून रिमोट घेऊन कोपऱ्यातल्या टीव्हीकडे रोखून बटन दाबलं. गेले दोन–तीन दिवस लग्नाच्या धमाल कार्यक्रमांमधे, खाण्यापिण्यामधे टीव्ही तर जाऊच दे, रोजचा पेपर वाचणं देखील झालं नव्हतं.

बातम्या पाहतांना जॉन चमकला. अमेरिकेची ब्रेकिंग न्यूज होती. बिंग हॅम्पटन, न्यूयॉर्क अमेरिकन सिव्हिक असोसिएशनच्या इमारतीवर अतिरेक्यांचा हल्ला! जॉनला एकदम मार्था आँटी आठवली. त्याची दूरची नातेवाईक. म्हणजे या लग्नसमारंभातल्या इंडियन स्टँडर्डस्नी दूरची नाही. पण अमेरिकन स्टँडर्डनी दूरची. ती अमेरिकन सिव्हिक असोसिएशन मधे काम करायची क्लर्क म्हणून. पंधरा अमेरिकन्स ठार, इमारतीत शिरता शिरता गोळीबार. तालिबानच्या बैतुल्लानं जबाबदारी स्वीकारली पण एफ. बी. आय.चं म्हणणं की बैतुल्ल फुकटचं श्रेय घेतोय. हा हल्ला इस्राईलच्या आतंकवाद्यांचा. शरद पवार यांचं पुन्हा 'तळ्यात–मळ्यात'. पाकिस्तानमधे देखील पुन्हा बाँबस्फोट. जीना सुपरमार्केटजवळ.

जॉननं चॅनल बदलला. परवा रात्री 'संगीत' होतं त्यावेळी सगळे ज्या गाण्यावर नाचत होते ते गाणं लागलं.

देखी लख लख परदेशी गर्ल्स
मुझको प्यारी लगे देसी गर्ल
देऽऽसी गर्ल, देऽऽसी गर्ल.

जॉननं जांभई देऊन टीव्ही बंद केला आणि तो पलंगावर पसरताच त्याचे डोळे आपोआपच मिटले.

जॉननं कॅमेरा त्या माणसावर रोखला. त्यानी आपल्या गळ्यात लटकणाऱ्या पिशवीत दोन्ही हात घातले होते, ते एकदम झटक्यानं बाहेर काढले, आणि दोन मुठी भरून हळद एकदम उधळली.

जॉन खूषच झाला. हँडीकॅमच्या लेन्समोर दोन झगझगीत पिवळे स्फोटच झाले. त्याच्यामागे गोल करून उभ्या असलेल्या चारजणी नाचायला लागल्या. संबळवाल्यांनी एकदम टांग टांग टांग टांग तडम् तडम् करून संबळ बडवायला सुरूवात केली आणि हळद उधळणारा उंच टिपेच्या स्वरात गायला लागला :

अंबाबाईच्या नावानं
मांडला गोंधळ, मांडला गोंधळ
तिचा खंडोबा मल्हार
कसा गोंधळ कसा गोंधळ
भंडारा उधळून
राती गोंधळ, हाती गोंधळ
अंबाबाईच्या नावानं
मांडला गोंधळ, मांडला गोंधळ

मग नाचणाऱ्या चार जणी आणि संबळवाले दोन जण गाणाऱ्याच्या अगदी जवळ आले आणि सगळ्यांनी मुठीतून हळद उधळून जोरात ओरडा केला :

येळकोट येळकोट जय मल्हाऽऽर!
येळकोट येळकोट जय मल्हाऽऽर!

आणि मग पुन्हा सगळेजण त्या प्रमुख गायकापासून दूर झाले. आणि तो पुन्हा एकदा नाचत गात राहिला.

आई उदे ग् अंबेचा
मुखडा कसा शोभतो
हिरव्या शालूत ग
सोजिरा गोजिरा वाटतो
काकणं कोपरापर्यंत
सौभाग्य चुडा चमकतो

उदे उदे ग अंबाबाय–

खंडोबा वाटऽ पाहतो!

त्याच्या मागे त्या चार नर्तकी नाचत होत्या, अन् दोन कोपऱ्यात दोन संबळ गळ्यात अडकवलेले तल्लीन होऊन काठ्यांनी संबळ बडवत होते. मधे मधे ''येळकोट येळकोट जय मल्हाऽर !'' चा घोष होत होता. आणि हवेत पिवळ्या रंगाचे स्फोट होत होते. इतकं रंगीबेरंगी शूट करायला मिळालं म्हणून जॉन भलताच खूष झाला होता.

साडे अकरा वाजता गाण्यांचा दणका जरा थंडावला. सगळे नाचणारे कपडे बदलायला आणि थोडा आराम करायला आतल्या खोल्यांमधे गेले. सगळीकडे जायफळ घातलेली दाट दुधाची कॉफी सर्व्ह व्हायला लागली. नरेंद्रनं जॉनला जवळ येण्याचा इशारा केला. हातातला हँडीकॅम सोडून तो गळ्यात लटकू देऊन जॉन नरेंद्र जवळ आला.

''जॉन'' नरेंद्र दबक्या आवाजात एखादं गुपित सांगावं तसं बोलत म्हणाला,

''चुपचाप माझ्यामागे ये. तुला वाईल्ड बोअर खायला घालतो. ॲस्टेरिक्सच्या कॉमिक्समधे असतं नं, अगदी तसं!''

बंगल्याच्या उत्तर कोपऱ्यातच एक लपून बसलेला जिना होता. ज्यांना त्याची माहिती आहे त्यांनाच सापडेल असा. एका उंच उगीचच बांधून अर्धवट सोडून दिल्यासारख्या भिंतीच्या मागे. नरेंद्रबरोबर जॉन त्या जिन्यानं एका लपलेल्या टेरेसवर गेला. बंगल्याच्या इतर टेरेसेस वरून किंवा मुख्य, सर्वात वरच्या गच्चीतून देखील ही टेरेस दिसायची नाही. मुख्य गच्चीतून बाकी सगळ्या टेरेसेस दिसायच्या, पण ही नाही! त्या टेरेसवर नरेंद्रचे शाळेपासूनचे वाईमधले मित्र चंद्रकांत शिवरे पाटील आणि भास्कर कोळसे पाटील नरेंद्रची वाटच पहात होते. त्यांच्या बरोबर त्यांचे आणखी दोन साथीदार देखील होते. चंद्रकांत, भास्कर आणि नरेंद्र एकत्र शिकारीला जायचे. सगळी व्यवस्था करायला दोन–तीन गडी होते. तीन गाद्या टाकून कठड्याला टेकून बैठक केली होती. लोड–तक्के ठेवले होते. कोपऱ्यात दोन लखलखीत, पितळी, ब्रिटीशकालीन मोठ्ठया स्पिरीट स्टोव्हरवर वाईल्ड बोअर म्हणजे रानडुकरांचे मांस रटरटत होतं. तिथेच एका

कोपऱ्यात एकजण घमेल्यातल्या निखाऱ्यावर ते मांस नुसतं भाजत होता. एका मिशाळ फेटेवाल्यानं चंद्रकांत, भास्कर, जॉन आणि नरेंद्रला स्कॉचचे ग्लास दिले.

''मी मारला बरं का हा रानडुक्कर,'' भास्कर म्हणाला.

''काल दुपारी काहीच करायला नव्हतं, इथूनच जीप घेऊन गेलो होतो. वाईच्या पुढे, पाचगणी पायथ्याच्या जंगलात.''

''हो! मला पण नेलं बरोबर!'' चंद्रकांत म्हणाला.

''अरे , आणि एक पण गोळी नाही चालवली बरं का! भाल्यानं मारलं.''

''ते टिपू सुलतानचं चित्र आठवतंय का? रानडुकराची भाल्यानं शिकार करतानाचं तसं!

तिघा मित्रांच्या शिकारीच्या गप्पा मस्त रंगल्या. रस्सा आणि भाकरी. नुतसं भाजलेलं मास. मीठ, तिखट, लिंबू लावलेलं आणि सुक्की, धनगरी भाजी. रानडुकराच्या मांसाची, कच्चे कांदे. हिरव्या मिरच्या. तिघांच्या गप्पा मराठीत चालल्या होत्या. जॉनला कळत नव्हत्या. पण जॉन त्या खाण्यापिण्यानं पुरता भंजाळला. त्यानं आफ्रिकेचा प्रवास केला होता. तिथलं 'कार्नव्होर' रेस्तराँ त्याला आठवलं. पण तिथल्या सपक जेवणापेक्षा हे जेवण फारच चविष्ट होतं. फ्लेकी टेक्श्चरचं, खवले खवले वेगळे होणारं, मऊ, रसानं भरलेलं, भाजक्या चवीचं रुचकर मांस! आणि आता तिखट खाण्याची गेल्या पंधरावीस दिवसात सवय झाल्यामुळे जॉन त्या झणझणीत रश्श्यात भाकरी कुस्करून मस्त ओरपत होता. बोट्या खात होता आणि मधून मधून 'गोंधळा' तल्या या मधेच अचानक ठरलेल्या 'मिनी फीस्ट'चं हँडीकॅमनं चित्रण करत होता. स्कॉच पुन्हा चढायला लागली होती. गेले तीन चार दिवस असंच पिणं सुरू होतं. तीन चार दिवसांच्या घटना सगळ्या एकत्र मिसळूनच गेल्या होत्या. कोणता दिवस कोणता हे वेगळं सांगणं कठीण जात होतं.

सव्वा बारानंतर अचानक टिपेला लावलेल्या आवाजातलं गाणं मेन हॉलकडून ऐकू यायला लागलं.

''चला, गोंधळ पुन्हा सुरू झाला.'' नरेंद्र घोट घेऊन ग्लास रिकामा करत म्हणाला. समोरच्या प्लेटमधली भाजलेली एक बोटी त्यानं तोंडात टाकली.

साडेबारापर्यंत सगळं आटोपून नरेंद्र, चंद्रकांत आणि जॉन त्या सहज न सापडणाऱ्या जिन्यानं खाली उतरून मेन हॉलकडे निघाले. त्या गुप्त टेरेसवर उरलेल्या

नोकरांची पार्टी सुरू झाली. आणि थोड्याच वेळात सगळ्यांनी मिळून उरलेल्या स्कॉचचा अन् उरलेल्या वाईल्ड बोअरचा फडशा पाडला. अगदी चट्टामट्टा केला!

जॉन पुन्हा मेन हॉलमधे आला तेव्हा 'पोतराज'चा खेळ सुरू झाला झाला होता. ''येळकोट येळकोट जय मल्हार. येळकोट येळकोट जय मल्हार''

सटाक फटाक् !

'पोतराज' चे स्वतःच्या अंगावर चाबकाचे फटके मारून घेणं बघून जॉन दचकलाच. त्याला एकदम 'दा विंची कोड' मधला स्वतःला फ्लॅजेलेशन करून म्हणजे चाबकाचे फटके मारून घेऊन मग त्यावर 'हॉर्स हेअर' म्हणजे घोड्याच्या केसांचा कोट घालणारा अल्बिनो आठवला.

पण ते त्यानं वाचलेलं होतं आणि हे तो प्रत्यक्ष पहात होता. शिवाय हा पोतराज त्या अल्बिनो सारखा राखाडी उदासवाणा नव्हता. रंगीत झगझगीत घागरा घालून गोल फिरत होता आणि गाणं म्हणत नाचत स्वतःवर फटके मारुन घेत होता.

''येळकोट येळकोट जय मल्हार.

येळकोट येळकोट जय मल्हार''

सटाक् फटाक् ! सटाक् फटाक्।

सटाक् फटाक् ! सटाक् फटाक् ।

आता नरेंद्र आणि त्याची बायको सुजाता दोन सिंहासनासारख्या खुर्च्या मांडल्या होत्या त्यावर बसलेले होते. कालच त्यांचं लग्न झालं होतं. आजची ही देवी जागरणाची रात्र. परवा रात्री ते हनीमूनसाठी मलेशियाला निघणार होते. जॉनचा मोबाईल वाजला. त्यानं हँडीकॅम सोडून दिला आणि तो गळ्यात लटकू दिला. सहा इंच बाय चार इंच, आणि जाडी एक इंच, असा तो लेटेस्ट, महागडा हँडीकॅम होता.

''ओऽऽ! हॅलो ल्युसी! याऽ! याऽ याऽ द ग्रेट इंडियन मॅरेज. विल सेंड यू क्लिप्स टुमॉरो. या! नो?''

तो एकदम गंभीर झाला.

''ओके. गो टु मार्था आंटी. आयाम नॉट सीईंग एनी न्यूज. ब्लडी – आय हॅव नो टाईम. धिस ग्रेट इंडियन वेडिंग अँड इट्स शूटिंग इज टेकिंग अप ऑल माय टाइम! बाऽय! टेक केअर!'' मग समई नृत्य सुरू झालं. हॉलमधले दिवे मंद झाले. झुंबरं

विझली. चार अगदी झीरो पॉवर सारखे दिवे ते काय राहिले. आणि मग लहान लहान सोनेरी ज्योतींनी झगमगणाऱ्या प्रकाशाच्या झाडांच्या लयबद्ध हालचाली गोल रिंगणामध्ये सुरू झाल्या. आधी मंद गतीनं तोल सावरत संथपणे, पण जसजशी संगीताची लय वाढली तशा जास्त जास्त वेगानं आणि शेवटी तर हालचालींवर नजर आणि हँडिकॅम ठरेना! मग हळूहळू सर्व नर्तिका एकत्र आल्या, लय पुन्हा मंद होत गेली. आणि प्रकाशाच्या पाकळ्यात असलेल्या सूर्यफुलासारखी आकृती बनवून हॉलच्या मध्यभागी सगळ्या थांबल्या. टाळ्यांचा कडकडाट झाला. आणि एकेक करून दिवे लागले, झुंबरं पेटली.

आता पहाटेचे दोन वाजत आले होते. नरेंद्र त्याच्या नातेवाईकांच्या घोळक्यात होता. तो आणि त्याची बायको सुजाता, नरेंद्रचे नवे नातेवाईक, काल लग्न झालं तेव्हापासून झालेले आणि जुनेसुद्धा, ते आता सुजाताचे नवे नातेवाईक. लग्न लागल्यानंतर नेंरद्र १२२ लोकांच्या पाया पडला होता. एकशे बावीस वेळा पूर्ण खाली वाकला होता! माय गॉड! जॉननं हँडीकॅमची व्हीडीओ क्लिप लॅपटॉपवर घेऊन बघताना मोजलं होतं. आता देखील त्याच्या मनात आले – चला, आपल्या खोलीवर जाऊन हँडीकॅमच्या सगळ्या क्लीप्स लॅपटॉपवर घ्याव्यात आणि हँडीकॅमची मेमरी मोकळी करावी. टीव्ही पण बघायचा होता. ल्युसीनं सांगितलं होतं की ती दंगे झाल्यामुळे रस्त्यातच अडकली होती. अमेरिकन सिव्हीक असोसिएशनच्या हल्ल्याच्या वेळी मार्था आंटी तिथेच होती. त्याच इमारतीत, पण सुदैवानं तिला हातावर दोन चार ओरखडे येण्याव्यतिरिक्त काही इजा झाली नव्हती. तो वळून निघणार एवढ्यात नरेंद्रच्या आजूबाजूच्या लोकांमधून एक फक्कड मिशावाला, बहुधा नरेंद्रचा काका, त्यानं हाक मारली ''ओ मिस्टर जॉन प्लीज कम हिअर! प्लीज कम हिअर!'' जॉनला त्या घोळक्यात ओढलं गेलं. ''मिस्टर जॉन, हाऊ कम यू ऑलवेज शुटिंग समथींग विथ दॅट डॅम थींग!'' ''ओ ! आय हॅव नेव्हऽ सीन नथींग लाइक इट. आय वाँट टू प्रीझर्व्ह फॉर मेमरीज!'' ''यू डॉक्युमेंटरी फिल्म मेकर?'' ''नो, बट विथ धीस मटेरियल, आय कॅन मेक वन!''

''नरेन्!'' तो मुच्छडकाका नरेंद्रला म्हणाला, ''ही शुटेड ऑल युवर वेडिंग-बीडिंग! नाऊ टेक हिम टू हनिमून. ही विल शूट दॅट ऑल्सो!''

काहीजण खदाखदा हसले.

नरेंद्र थक्क होऊन आश्चर्यानं काकांकडे बघायला लागला. एकदम शांतता पसरली. सुजाताचे आधी कान आणि मग पूर्ण चेहरा लालबुंद झाला. ती तिच्या सिंहासनावरून उठली आणि ''एक्सक्यूज मी, नरेन्! मी जरा आलेच थोड्या वेळात!'' म्हणून तिथून आत कुठल्यातरी दालनात निघून गेली.

मग कुणीच त्या मुच्छडशी बोलेना. तेव्हा तो देखील उठून निघून गेला आणि तो दूर जाताच सगळे खळखळून हसले. सगळा तणाव वितळला.

जॉननं बघितलं, नरेंद्रने आयपॉडचे इयरफोन कानात घातले.

''काय ऐकतोस?'' त्यानं इंग्रजीत विचारलं.

''रेडिओ के.अे.ओ.अेस.''

''ओ हो!''

''तू संध्याकाळी आठवण करून दिलीस नं! मला तर सँडर्सच्या रुमवरची अेक्स्टसीची पार्टी आठवली! म्हणून आय ट्यून्स वरून डाउनलोड केली. ओके, नाव लेट मी लिसन!''

नरेंद्रनं बटन दाबलं.

धिस इज लाइव्ह रॉक अँड रोल अॅट के.अे.ओ.अेस. व्हेअर रॉक अँड रोल कम्स आऊट ऑफ केऑस. अँड नाऊ, अ साँग कॉल्ड

द पॉवर्स दॅट बी

द पॉवर्स दॅट बी

द पॉवर्स दॅट बी................

...................दे लाईक अ टफ गेम

नो रुल्स..................

....................दे लाईक ऑर्डर,

मेकअप,

लाईम, लाईट, पॉवर,

गेम शोज, रेडिओज,

स्टार वॉर्स, टीव्ही,

दे आर

द पॉवर्स दॅट बी

द पॉवर्स दॅट बी

द पॉवर्स दॅट बी

इफ यू सी देम कम

यू बेटर रन

यू बेटर रन ऑन होम...

यू बेटर रन ऑन होम...

जॉननं इशाऱ्यानं ‘जाऊन येतो’ म्हणून सांगितलं आणि नरेंद्र मान हलवली.

जॉन आपल्या खोलीकडे निघाला. त्याला हळदीनं पिवळे झालेले कपडे पण बदलावेसे वाटत होते. तो एका कॉरिडॉरमधून जातो तर मागून एकदम कुणीतरी पैजणांचा आवाज करत धावत आलं आणि

‘‘सर, सर स्टॉप. आय स्पीक इन इंग्लिश, सर!’’ असं म्हणत निळाभोर शरारा घातलेली कमळी त्याच्यासमोर येऊन उभी राहिली. केतकीच्या पानापारखी पिवळीधमक गोरी, आणि हनुवटीवर ‘देअर फोर’ या गणिती चिन्हासारखी एक वर आणि दोन खाली अशी तीन हिरवीगार टिंबं गोंदलेली. वाड्यावरच्या नोकरांपैकी एक! आल्यापासून ती जॉनच्या मागे लागली होती. त्यानं तिचं थोडं ‘‘रिंग रिंग रिंगा, रिंग रिंग रिंगा’’ या स्लमडॉग मिलिनियरच्या गाण्यावर शूटिंग पण केलं होतं. ती नखरेल बालिशपणानं मुरकत जॉनला म्हणाली,

‘‘आय वाँट टु सी सर! हाऊ इंग्लिश डू?’’

जॉननं हास्याचा स्फोट केला.

‘‘आयाम अमेरिकन, नॉट इंग्लिश!’’

‘‘सेम सर!’’ कमळी आपल्या छातीवर एका हातानं चोळत कट्यार काळजावर चालवल्याची ॲक्शन करत म्हणाली.

‘‘आय वाँट टु सी हाऊ यू डू !’’

ते पाहून जॉन जरा पेटलाच ! एकाएकी पुढे होऊन त्यानं तिच्या कट्यार चालवणाऱ्या हाताचं कोपर धरलं, दुसरा हात कमरेत घातला, आणि वेगानं तिला चालवत म्हणाला,

''कम देन! आय विल शो यू!''

जॉन तिला बंगल्याच्या उत्तर दिशेला घेऊन गेला. तिथे एक गुप्त जिना होता, त्या जिन्यानं एका लपलेल्या टेरेसवर घेऊन गेला. त्याच्या वॉलेटच्या स्पेशल झिप पाऊच मध्ये दोन-तीन कंडोम तर नेहमी असायचेच! दोघेही टेरेसवर आले. मघाच्या 'वाइल्ड बोअर' च्या पार्टीची टेरेस. आता तिथे कुणीच नव्हतं. सगळं सामानं नेलं होतं. पण कठड्याला टेकून तीन गाद्यांची मघाची बैठक तशीच होती.

जॉननं टेरेसवर येताच जिन्याचं दार घट्ट लावून घेतलं आणि कमळीला घट्ट मिठी मारली. तिच्या ओठांवर ओठ ठेवले. चांदणं जास्त घनदाट झालं. कमळीचं सगळं सौदर्य त्यानं चंद्रप्रकाशात न्हायलेलं पाहिलं. तिचं बोलणं त्याला त्यावेळीच किंचित विचित्र वाटलं. ती आपल्या तोडक्या मोडक्या इंग्रजीत खूप बडबडत होती.

त्या थंड हवेत, चांदण्या रात्रीत उघड्या आकाशाखाली तीन वेळा अवर्णनीय आनंद घेऊन जॉन कमळीला बाय बाय करून आपल्या रुमवर येऊन पलंगावर पसरला तेव्हा पहाटेचे साडेतीन वाजले होते. सहज चाळा म्हणून त्यानं रिमोट दाबला.

स्वात खोऱ्यावर तालिबानचा कब्जा, एका बाईला कमरेपर्यंत जमिनीत पुरुन मोठ्या काळ्या चाबकांनी दोन मौलवी मनसोक्त बडवत होते. त्यांचे डोळे चकाकत होते आणि तोंडातून लाळ गळत होती आणि हे दृश्य गर्दी शांतपणे पहात होती. 'काईट रनर' मधे जॉननं वाचलं होतं की गावातला एकहीजण गैरहजर राहू नये याची खबरदारी घेतात, तालिबान! जॉननं वैतागून टीव्ही बंद केला झोपायचा प्रयत्न केला तर झोप येत नव्हती. त्यानं रुम सर्व्हिसला फोन करुन - हो! लग्नासाठी खास ही फोनची सोय केली होती पाहुण्यांच्या प्रत्येक रुममध्ये -कॉफी मागवली जायफळवाली नको - नेस्कॅफे, स्ट्राँग ! पूर्ण दुधाची नको, ब्लॅक पण नको, अर्धा दूध अर्धा पाणी.

मग त्यानं कपाटातला लॅपटॉप काढला. हँडीकॅमवरचं आज दुपारपासूनचं सगळं शूटिंग लॅपटॉपवर घेतलं आणि हँडीकॅमची मेमरी पुन्ही पूर्ण कोरी केली. एवढ्यात

कॉफी आलीच. मग त्यांन कॉफी पिता पिता एक डीव्हीडी राइट केली, म्हणजे रेकॉर्ड केली. आता लॅपटॉपवरच्या आजच्या सगळ्या व्हिडीओ क्लिप्स–जवळ जवळ अडीच तीन तासांच्या–डीव्हीडीवर आलेल्या! त्यानं मार्करनं त्यावर लिहिल : इंडिया–डिव्हीडी नंबर ट्वेंटी थ्री – आणि ती डीव्हीडी पाऊच मध्ये ठेऊन दिली. चोवीस डीव्हीडीचा पाऊच होता. आता एकच जागा उरली होती.

बापरे! पाऊचकडे पाहतांना जॉन आठवत होता, त्यानं भारतात आल्यावर काय काय शूट केलं होतं! विमानतळावर उतरतांना पासून! धारावी. मुंबईच्या लोकल्स, लटकणारी माणसं. रस्त्यावर एका छरमाड, फाटक्या माणसाला चार पोलिस मिळून काठ्यांनी बडवतांना. ड्यूक्स नोज उर्फ नागफणी! नागफणी हे मूळ नाव! ड्यूक्स नोज म्हणजे ब्रिटीश पिल्लू. पण मूळ नाव कमी जणांना माहित. हिरवागार झालेला खंडाळा घाट. धबधबे. चित्रविचित्र भिकारी – अबब! किती प्रकार त्यांचे! मिरवणूका. त्यामुळे होणारे ट्रॅफिक जॅम! लग्नाच्या मिरवणुका. दिल्लीच्या क्लिप्स. पराठेवाली गल्ली, आग्रा, ताजमहाल, तो भारत पर्यटन करण्यासाठी लग्नाच्या आधीच वीसेक दिवस आलेला होता. नरेंद्रनं त्याला विमानाची तिकिटं, स्पेशल कार बुकिंग्ज, सगळं विनामूल्य पुरवलं होतं. त्याचं पर्यटनं थोडफार आखून दिलं होतं. पण त्याला मनाला वाटेल तसं भटकायला मोकळीक देखील ठेवली होती. व्हॅली ऑफ फ्लॉवर्स, भेडाघाट, जैसलमेर आणि गोवा! काय एकेक भन्नाट अनुभव होता तो! हृषिकेश – तिथला एक आश्रम – नरेंद्रनं त्याला बजावून सांगितलं होतं तिथे जायलाच पाहिजे म्हणून आणि इथे पुण्यात आल्यापासून लग्नाची धमाल मेहंदी–हल्दी–संगीत–लग्न–आणि आता लग्न लागल्या नंतरचा हा गोंधळ! केऑस!

द पॉवर्स दॅट बी

द पॉवर्स दॅट बी

यु बेटर रन.........

यु बेटर रन ऑन होम!

जॉननं पुन्ही डीव्हीडीच्या पाऊचवरून प्रेमानं हात फिरवला. केवढा विस्तीर्ण पट होता हा संस्कृतीचा! आणि किती विविध! अन् देवभूमी केरळ! ती कशी विसरला तो? तिथला आयुर्वेदिक अनुभव! वाऽव सच प्लेझर! किती ते सुख!

जॉनला तो ऋषिकेशचा स्वामी आठवत राहिला. तो त्याला म्हणाला होता कसलं जग अन् कसलं काय! सगळं विश्व होऊन गेलेलं आहे. तो सूर्य – तो तुला दिसतो – तो सूर्य तिथे आहे असं तू म्हणतोस, पण खरं तर त्या सूर्यापासून निघालेला प्रकारश तुझ्यापर्यंत पोहोचायला आठ मिनिटं लागतात. म्हणजे आठ मिनिटांपूर्वी तो सूर्य तिथे होता. एक प्रकाशवर्ष दूर असलेला तारा – एका वर्षापूर्वी तिथे होता. तुझा हात. काही नॅनो सेकंदांपूर्वी तिथे होता. म्हणजे तुझ्यात एक बिंदू फक्त आहे, आणि तो म्हणजे तुझी जाणीव. त्या जाणीवेच्या बिंदूपासून अमर्याद अंतरापर्यंत सगळं विश्व सगळ्या दिशांनी जास्त जास्त शिळं होत गेलेलं म्हणजे तुझ्या जाणिवेच्या बिंदूपासून जितकं दूर जाऊ – तितकं भूतकाळात! आहे की नाही गंमत? तुझी जाणीव हा एकच बिंदू या प्रचंड अवकाशात आहे. बाकी सगळं विश्व होतं. आणि बिंदूची व्याख्या काय? तर लांबी, रुंदी, उंची, खोली नसलेला! म्हणजे मग हे विश्व अस्तित्वात आहे की नाही? का तुझ्या जाणिवेच्या एका बिंदून सभोवर पसरलेलं ते गारुड आहे? भूतकाळात प्रसरण पावत गेलेलं? हे विश्व अस्तित्वात आहे? की होतं?

जॉन निरुत्तर झाला होता.

त्यानं फक्त स्वामीजीला विचारलं, ''तुला इतकं चांगलं इंग्लिश कस येतं?''

''म्हणजे काय?'' स्वामीजी मिस्किलपणे, अर्थात इंग्रजीत म्हणाला, ''मी एक मॅथेमॅटिशियन आणि प्रोग्रामर होतो, इथे येऊन स्थिर होण्याआधी!''

निरोप घेताना स्वामीजी म्हणाला, ''एक दिवस तू देखील स्वतःच्या जाणीवेच्या बिंदूचं या विश्वातलं प्रयोजन समजशील आणि मग सगळा गोंधळ संपेल. सगळा केऑस संपेल आणि तो तुझ्या ज्ञानप्राप्तीचा क्षण असेल!'' जॉननं यावर खूप विचार केला होता आणि एकेक कोडं त्याला उलगडायला लागलं होतं.

आणि परत आल्यावर त्यानं नरेंद्रबरोबर स्वामीजींविषयी चर्चा केली, तर नरेंद्र खळखळून हसला.

''मला मी बारावीत असतानाच नेलं होतं बाबांनी स्वामीजींकडे! हे सगळं जग फक्त आपल्या श्वासांवर उभं आहे आणि श्वासांबरोबर ते बाहेर प्रकटतं आणि आपल्या आत अदृश्य होतं, असं मला अगदी लॉजिकली पटवून दिलं होतं त्यांनी! पण

असा गंभीर बनू नकोस! स्वामीजींना गंभीरपणा आवडत नाही. मस्त मनसोक्त मजा करत रहा. जीवनावर प्रेम कर! या विश्वावर प्रेम करायला शीक! हे विश्व छान आहे हे तुला एकदा जाणवलं की तुला स्वतःला तू स्वतः पण छान वाटायला लागशील! मग सगळंच असमाधान नाहीसं होईल, नाही का?'' जॉन काहीच बोलला नाही.

पण खरं तर त्याचा एक्झॅक्टली हाच प्रॉब्लेम होता. त्याला कशात रस वाटेनासा झाला होता. पण भारतात आल्यापासून तो अचानक रसरशीत, जीवंत झाला होता. इथला आरडा ओरडा, रंग, वास, चवी, गर्दी, माणसं, अन्न, तिखटपणा, भाबडेपणा, भ्रष्टाचार, हो, भ्रष्टाचारसुद्धा! पण कसा– तर अगदी आतल्या गाभ्यापर्यंत सडलेला. या सगळ्या जीवंतपणाच्या खुणाच होत्या! आणि त्या स्वामीच्या संमोहनानं तर सगळे तुकडे एकात एक बसत गेले आणि चित्र, निदान तेव्हा तरी पूर्ण झाल्यासारखं वाटलं!

एक सणक डोक्यात आली म्हणून जॉननं पाच नंबरची डीव्हीडी लॅपटॉपवर टाकली. आणि तो केरळचं निळं सौंदर्य पाहण्यात गुंग झाला. त्याच्या मनात ते गाणं अनाहत नाद बनलं होतं –

द पॉवर्स दॅट बी
द पॉवर्स दॅट बी
इफ दे कम नीअर टु यू –
यू बेटर रन...
यू बेटर रन ऑन होम!....

एवढ्यात मेन हॉलच्या दिशेनं पुन्ही टिपेला गेलेल्या आवाजात गाणं सुरू झालं, संबळ वाजायला लागली आणि जॉनच्या डोक्यातला अनाहत नाद बटण दाबल्यासारखा फट्कन बंद झाला. तो डोकं झटकून ताळ्यावर आला. लॅपटॉप बंद करून, मेमरी पूर्ण स्वच्छ केलेला हँडीकॅम घेऊन उत्साहानं मेन हॉलकडे निघाला. त्यावेळी पहाटेचे साडेचार वाजत आले होते. गोंधळ सुरूच होता. सहा वाजता सूर्योदय झाला आणि मेन हॉलच्या दारातून उन्हं बरोबर गोंधळासाठी स्थापन केलेल्या अंबाबाईच्या मूर्तीच्या पायावर आली!

जागरण संपलं! अंबाबाईची आरती झाली आणि शुद्ध तुपातले अति मुलायम काजू–पिस्ता रोल प्रसाद म्हणून वाटण्यात आले. ते खाऊन जॉन ''आता फायनली झोपावं बॉ'' असा (इंग्रजीत) विचार करुन आपल्या खोलीत गेला. आपला एक अवयवच असल्यासाखा झालेला हँडीकॅम त्यानं गळ्यातून काढून ठेवला आणि दाराची कडी आतून व्यवस्थित लावून धाडकन पलंगावर पडून तो गाढ झोपून गेला!

***

दरवाजा जोरजोरात खडखडावला जात असल्यानं जॉनला जाग आली. त्यानं उठून दार उघडलं. डोळे चोळत पाहिलं तर नरेंद्र स्वतः!

''ओ होऽ'' आत येऊन पलंगावर बसत जॉननं उशीखालचं घड्याळं काढून पाहिलं. आठ वाजलेले होते. दार लावून नरेंद्र आत आला अणि आराम खुर्चीत बसून जॉनला म्हणाला,

''जॉन; काहीतरी भयंकर घडलंय! कमळी माहितीय नं? तिनं तलावात उडी मारुन आत्महत्त्या केलीय ! ती बोट घेऊन मध्यापर्यंत गेली आणि तिथे उडी मारली. बोट हाऊसचा केअर टेकर सकाळी आला, तर त्याला एक दोरी सोडलेली बोट मध्यावर तरंगतांना दिसली. ती काठावर आणायला तो मोटरबोटनं गेला, तर बोटीच्या शेजारी कमळीचं प्रेत तरंगत होतं!'' जॉनचा चेहरा कसासाच झाला. हिरवट, राखाडी रंगाची छटा त्याच्या चेहऱ्यावर पसरली होती.

''काय झालं?'' आश्चर्यानं त्याच्या चेहऱ्याकडे पहात नरेंद्रनं विचारलं. जॉननं सगळं कमळी प्रकरण नरेंद्रला सांगितलं. टेरेस वर तिच्याबरोबर केलेला संभोग, सगळं.. ..

''एवढंच नं? काळजी नको करुस! पोलिस येतील तेव्हा हे काही सांगू नकोस.''

''ठीक आहे.''

''शांत रहा. तू काही जबरदस्ती केली नाहीस नं? मग तुला कसली भीती? तुला कुणी काही करणार नाही. डॅडचा इन्फ्लुएन्स भरपूर आहे!''

''ओके''

पोलिस इन्स्पेक्टर वैरागडेंनी जॉनची बऱ्यापैकी कसून चौकशी केली. सगळ्या पाहुण्यांची जुजबी चौकशी आणि नोकरांची मात्र बराच वेळ अशी चौकशी चालली होती.

दहा वाजून गेले होते. जॉन पुन्हा झोपून गेला. त्याला फार अपराधी वाटत होतं. आपलीच चूक झाली असं वाटत होतं. त्या अपराधी भावनेमुळे त्याला चित्रविचित्र स्वप्नं पडत होती. कमळी त्याच्या नावानं ओरडून तळ्यातून बाहेर आली आणि मोठी मोठी होत तिचं स्वातंत्र्य देवतेच्या पुतळ्यात आणि तलावाचं समुद्रात रुपांतर झालं. मग एक विमान जोरात स्वातंत्र्य देवतेच्या पुतळ्यावर एका बाजूनं आपटून दुसऱ्या बाजूनं बाहेर आलं आणि स्वातंत्र्यदेवतेचा पुतळा धडाघड समुद्रात कोसळला. न्यूयॉर्कची स्कायलाईन आणखी मोकळी झाली. पुन्हा एकदा बदलली.

मग त्याला इन्स्पेक्टर वैरागडे दिसले आणि ते अतिशय संशयानं त्याच्याकडे पहात होते.

जॉन जागा झाला तेव्हा तो एअरकंडिशनर सुरू असूनही घामाघूम झालेला होता. बाथरुम मध्ये जाऊन त्यानं हात-तोंड धुतले आणि तो नरेंद्रला शोधायला निघाला. नरेंद्र त्याला कॉरीडॉरमधून बाहेर पडताच बागेत रंगीत छत्रीखाली टाकलेल्या टेबलाशी बसून नाश्ता करतांना दिसला. जॉन टेबलाशी बसताच नरेंद्र म्हणाला, ''तुझं बुकींग केलं बरं का अरेंज, आज रात्री दहाला फ्लाईट, सहारला जायला कार पण सांगितलीय. इथे येऊन तुला पिकअप करेल. चार वाजता. तू तयार रहा.''

''ठीक आहे,'' जॉन निर्जीवपणे म्हणाला अजूनही कमळीचा विषय त्याच्या मनातून जात नव्हता.

''--अरे हो! कमळीचा पोस्टमार्टेम रिपोट आला. कॅन यू बिलीव्ह? शी वॉज कॅरींग! दुसरा महिना होता तिला! आणि मुलाचा बाप आमचाच नोकर हीरु. अन् ती सारखी त्याच्या मागे लागली होती लग्न कर म्हणून. पण तो तयार होत नव्हता.''

''म्हणून तिनं आत्महत्त्या केली?''

''हो.''

''त्या हीरुनं करायला पाहिजे होतं लग्न!''

''नाहीनं, त्याचंही बरोबर आहे, कारण तिचं त्याचवेळी भरत म्हणून ड्रायव्हर आहे एक आमचा, त्याच्या बरोबर पण चालू होतं. अन् आता सध्या तर आत्महत्त्या म्हणताय्त, अन बहुतेक तसंच असावं असं मला वाटतंय, पण ती कदाचित त्या दोघांना ब्लॅकमेल पण करत असावी! आणि सेफ्टी नेट म्हणून अजून एक असावा म्हणून कदाचित तिनं तुला पकडलं असेल.''

''ओऽ माय गॉड्'' जॉन आपला खाली लोंबणारा जबडा मिटून म्हणाला, ''मी केवढा स्वतःला अपाराधी समजत होतो !''

''उलट तू मरण्याआधीच्या तिच्या शेवटच्या इच्छा पूर्ण केल्यास!''

''हं! असंच दिसतंय. बरं तुझा तो आयपॉड दे नं, 'रेडिओ केऑस' असलेला मी घेऊन जातो प्रवासात.''

''चालेल देतो आणून.''

ब्रेकींग न्यूज-तालिबानने पाक पोलिस ट्रेनिंग इन्स्टिटियूटवर हल्ला करून पोलिस प्रशिक्षण घेणाऱ्या पन्नास जणांना मारलं. पण आता तो घरी चालला होता. त्यानं आयपॉडचा आवाज वाढवला. त्याला अचानक गोंधळातल्या ओळी देखील आठवत होत्या.

आला घरी आला
खंडोबा जेजुरीला.
गुळपाणी देई
अंबाबाई मल्हाराला.
त्यानं आयपॉडचा आवाज वाढवला :
कुड बी जेरुसलेम ऑर इट कुड बी कैरो,
कुड बी बर्लिन, ऑर इट कुड बी प्राग,
कुड बी मॉसको, कुड बी न्यूयॉर्क ,
कुड बी लानेली, अँड इट कुड बी वॉशिंग्टन
कुड बी वॉरसा, अँड इट कुड बी मूज जॉ !
इट कुड बी रोम
एव्हरीबडी गॉट समव्हेअर दे कॉल होम !

एव्हरीबडी गॉट समव्हेअर दे कॉल होम !

आणि मग त्यानं शफल करताच पूर्ण आल्बम पहिल्यापासून सुरू झाला :

धि इज के.ए.ओ.एस. अँड यू आर लिसनिंग टु केऑस इन लॉस अँजेलिस !

रेडिओ वेव्हज........ही हीअर्स............रेडिओ वेव्हज.........

***

# अनिरुद्ध बनहट्टी



"अत्यंत समृद्ध परंपरा असलेल्या जागतिक भाषांपैकी एक म्हणजे आपली मराठी."

सध्याच्या स्थितीमध्ये हे असं बोलायला जरा धाडसीच वाटतं हे खरं. पण एकदा का ज्ञानेश्वर तुकाराम नामदेव एकनाथ बहिणाबाई पासून सुरू झालेली आणि आजही जिवंत असलेली साहित्यिकांची परंपरा पाहिली की जाणीव होते की मराठीसारखी दुसरी भाषा नाहीच. ही एकच अशी भाषा आहे जिथल्या संतकवींच्या दिंड्या घेऊन दशलक्षावधी लोक त्यांच्या ओव्या अभंग गात गात शेकडो मैल पायी तुडवतात. एकदा दोनदा नव्हे तर गेली सातशे वर्षं आणि वर्षातून दोनदा. ही एकच अशी भाषा आहे जिच्यामध्ये गेली नव्वदेक वर्षं साहित्य संमेलनं भरतात. ही एकच अशी भाषा आहे जिचं राज्य व्हावं म्हणून एकशेपाच हुतात्मे प्राण अर्पित करते झाले. आणि ही एकच अशी भाषा आहे, जिच्यात सर्व प्रकारच्या साहित्याला मुक्तद्वार आहे.

पण आजच्या घडीला मराठी साहित्य विशिष्ट शहरे आणि लोकांपर्यंतच सीमित झाले आहे. अनेक अतिशय चांगले लेखक अजूनही वाचकांत म्हणावे तितके नावाजले आणि वाचले गेलेले नाहीत. प्रा. डॉ. अनिरुद्ध बनहट्टी हे त्यातलेच एक. सिव्हिल इंजिनियरिंग मध्ये डॉक्टरेट, फ्रेंच भाषे मध्ये MA, जपानी भाषेचा डिप्लोमा व एस्परांतो या आंतरराष्ट्रीय भाषेचा प्रसार करणारे अनिरुद्ध यांची भाषा आणि तंत्रज्ञानावर जितकी पकड आहे तितकीच मानवी व्यवहारांतल्या शब्दापलिकडच्या भाषेवरही आहे. जी. एस. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनियरिंग मध्ये प्राध्यापक असलेले अनिरुद्ध बनहट्टी गेली चाळीसेक वर्षे कथा लेखन करीत आहे. सत्यकथेच्या मुशीतून (आणि सत्यकथेच्या दर्जाच्या चाळणीतून) तावून सुलाखून बाहेर पडलेल्या लेखकांपैकी ते एक. आजवर अनेक मासिक, नियतकालिकांतून त्यांच्या सुमारे पाचेकशे कथा प्रसिद्ध झालेल्या आहेत. स्वतःशी अत्यंत प्रामाणिक राहून जे स्वतःच्या मनाला योग्य वाटेल तेच लिहिणे आणि मार्केटमध्ये उठाव कसला आहे ते न पहाता स्वतःला जे दर्जेदार वाटले तेच प्रसिद्धीला देणे हा त्यांचा खाक्या.

जागतिक साहित्याच्या पटलावर चालणाऱ्या घडामोडींचा त्यांचा बारीक अभ्यास आहे. त्यांच्या कथांचा साहित्यिक दर्जा उच्च असूनही त्यांचा वाचकवर्गात म्हणावा तसा बोलबाला नाही. आज त्यांनी आपल्या काही कथा ई साहित्यसाठी दिल्या आहेत. पूर्णतः विनाअट आणि विनामूल्य. आपल्या वाचकांचा प्रतिसाद पाहून ते पुढील कथा द्यायच्या ते ठरवतील. तेव्हा मित्रांनो कथा कशा वाटल्या ते कळवाच. या तीन पैकी कोणती कथा तुम्हाला अधिक आवडली? या कथांमध्ये काय आवडलं? कोणतं वैशिष्ट्य जाणवलं?

स्त्री पुरुष संबंध, किंबहुना सर्वच माणसांचे आपसांतील संबंध वरवर कितीही सरळ दिसले तरी वरचा तलम पापुद्रा निघाला की आतली गुंतागुंत मनाला भेदून जाते. अंतर्मनाला भिडते. ही गुंतागुंत उलगडून दाखवणारे साहित्य हेच खरे साहित्य. ई साहित्य च्या द्वारे असे दर्जेदार साहित्य आपल्यासमोर येत राहिल. आपल्या प्रगल्भतेमध्ये भर घालत राहिल.

आपण सगळे मिळून अशा दर्जेदार लेखकांचे स्वागत करूया.

अनिरुद्ध बनहट्टी यांचा ई मेल पत्ता : anibanister@gmail.com

धन्यवाद
टीम ई साहित्य